JAYDEEP B. KULKARNI
B.E. (Civil), MIE, FIV
Chartered Engineer & Approved Valuer
Office : Shop No. 1, Runanubandh Renuka, Prof. Colony Chowk, Savedi, Ahmednagar - 414003. | Mo. : 9822049099
Resi. : "Shubham", Suyog Grih Mandal, Neal Prof. Colony, Savedi, Ahmednagar - 414 003
Tel. : (0241) 2422459

RNI No. 6153/57

समाचार
SAMACHAR

अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा नको? आता चष्मा घालवा कायमचा
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात शस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १ नांवनोंदणी आवश्यक
कॉन्टयूरा व्हिजन, मोतिबिंदू, काचबिंदू, नेत्ररोपण
आंतरराष्ट्रीय कीर्तिच्या नेत्रतज्ञांची टीम
लेसर नेत्रशस्त्रक्रियेचा जागतिक विक्रम
आंतरराष्ट्रीय कीर्तिचे भारतातील ४० वर्षे अनुभवी केंद्र
एशियन आय हॉस्पीटल, पुणे • साई दृष्टी हॉस्पिटल, मुंबई
वर्धमान, माणिक चौक, अहमदनगर ४१४००१
Email : saisuryaa85@yahoo.com
www.saisuryasupervision.com
Help line 9112288611 Appointment 8888982222

Volume - 72 | Issue- 208 | Marathi Daily | Thursday 25/4/2024 | Pages - 6 | Price- Rs. 3

अग्रलेख: समस्यांना सामोरे जायचे तर... पान २

कार्यशाळेत प्राध्यापकांना आधुनिक उपकरणावर प्रशिक्षण पान ५

महावीर इंटरनॅशनलच्या अहिंसा चित्रकला स्पर्धेस प्रतिसाद पान ६

उठाठेव
– विवेक मेहेत्रे

आयुष्यात प्रथमच आतमधून तुरूंग कसा असतो ते बघायची संधी मिळाली... 'आत असलेल्या पण निवडणुकीला उभे राहिलेल्या' काही जणांचे मिडिया कव्हरेजसाठी फोटो काढायचे होते ना!!

निवडक

नरेंद्र मोदी, राहुल गांधी यांना नोटीस

नवी दिल्ली, दि. २५– लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यातील मतदान पार पडले आहे. आता २६ एप्रिल रोजी दुसऱ्या टप्प्यातील मतदान होणार आहे. देशभरात प्रचार जोरदार सुरू आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि राहुल गांधी यांचे देशभरात दौरे सुरू आहेत. दरम्यान, आता पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांना केंद्रीय निवडणूक आयोगाने नोटीस पाठवली असून २९ एप्रिलपर्यंत उत्तर मागवले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या कथित आचारसंहिता उल्लंघनाची निवडणूक आयोगाने दखल घेतली आहे.

शरद पवार गटाचा जाहीरनामा प्रसिध्द

जातनिहाय जनगणना, महिलांना नोकरीत ५० टक्के आरक्षण

पुणे, दि.२५– लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी येत्या २६ एप्रिल रोजी मतदान पार पडणार आहे. या पार्श्वभूमीवर या टप्प्यातील मतदारसंघांमधील प्रचार थांबला आहे. मात्र, राष्ट्रीय स्तरावर इतर टप्प्यांसाठी मतदान आणि प्रचार मात्र चालू आहे. दुसरीकडे राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाकडून आज निवडणुकीसाठीचा जाहीरनामा प्रकाशित करण्यात आला. या जाहीरनाम्यात काही प्रमुख मुद्यांचा समावेश शरद पवार गटाडून करण्यात आला आहे. यामध्ये गॅस–सिलेंडरच्या दरांपासून महिलांसाठीच्या आरक्षणापर्यंतच्या मुद्यांबाबत भाष्य करण्यात आले आहे.

प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जाहीरनाम्यातील प्रमुख मुद्यांचा उल्लेख केला. शपथपत्रात समाजातील सर्व घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न आम्ही करू, असे म्हणणे मांडले आहे. स्वयंपाकाच्या गॅसच्या किमती कमी करून ५०० रुपयांपर्यंत आणल्या जातील. गरज पडली, तर केंद्र सरकार त्यासाठी अनुदानही देईल, जसे पूर्वी यूपीएच्या काळात व्हायचे. पेट्रोल–डिझेलवरील करांची पुनर्रचना करू. त्यामुळे पेट्रोल–डिझेलचे वाढलेले दर मर्यादित आणण्याचे काम होईल. महिलांसाठी शासकीय नोकऱ्यांमध्ये ५० टक्के आरक्षणाचा मुद्दा जाहीरनाम्यात समाविष्ट करण्यात आला आहे. देशभरात ३० लाखाच्या आसपास रिक्त जागा आहेत. आम्ही सत्तेत गेल्यानंतर त्या भरण्याचा आग्रह करू. महिलांचे शासकीय नोकरीतील आरक्षण ५० टक्के ठेवण्याचा आग्रह केला जाईल. जीएसटी देशातील लोकांना लुबाडण्याचे काम करत आहे. त्याला मानवी चेहरा देण्याचे काम आवश्यक आहे. जीएसटीच्या बाबतीत केंद्र सरकारचा हस्तक्षेप मर्यादित केला जाईल, अशी माहिती जयंत पाटील यांनी दिली.

सध्या उन्हाची तीव्रता मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे थंड पाण्याची गरज भासू लागली आहे. त्यासाठी विविध रंगाचे आणि विविध आकाराचे मातीचे माठ शहरातील महामार्गाच्या कडेला विक्रीसाठी आले आहेत. हे माठ खरेदी करण्यासाठी नागरिकांची ओढ वाढली आहे. **(छाया– देवीप्रसाद अय्यंगार)**

बीडमध्ये लक्ष देण्याचा भुजबळांचा सल्ला

प्रीतम यांना नाशिकमध्ये उभे करू- पंकजा मुंडे

बीड, दि. २५– नाशिक लोकसभा मतदारसंघात महायुतीकडून अद्याप उमेदवार जाहीर होत नसल्यामुळे राज्यभर याची चर्चा सुरु आहे. बीड येथे बोलताना भाजप उमेदवार पंकजा मुंडे यांनी प्रीतम मुंडे यांच्यावर अन्याय होणार नाही, वेळ आली तर प्रीतम मुंडेंना नाशिकमधून उभे करु, अशी थेट जाहीर घोषणा केल्यामुळे नाशिक लोकसभा मतदारसंघ हा पुन्हा नव्याने चर्चेत आला. मात्र, अजित पवारांच्या राष्ट्रवादीचे नेते छगन भुजबळ यांनी महायुतीला उमेदवार सापडत नाही, ही अडचण नसून खूप उमेदवार आहेत. ही अडचण असल्याचे म्हटले आहे. वंजारी समाजातील **(पान ३ वर)**

कोतवाली पोलिसांची कारवाई; १० लाखाचा मुद्देमाल हस्तगत

कत्तलीसाठी वासरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

समाचार/नगर-दि.२५

गोवंशीय जातीच्या वासरांची कत्तल करण्याच्या हेतुने वाहतूक करणारा टेम्पो कोतवाली पोलिसांनी पकडला. या कारवाईत एक जणावर कारवाई करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाच्या सपोनि योगीता कोकाटे, पोहेकॉ शाहीद शेख, ए. पी. इनामदार, पोना अविनाश वाकचौरे, संगिता बडे, पोकॉ सत्यजित शिंदे, तानाजी पवार, सुरज कदम, अतुल काजळे, दिपक रोहोकले, सचिन लोळगे, ढाकणे यांनी कारवाई केली आहे.

पोलीस निरीक्षक प्रताप दराडे यांना माहिती मिळाली की, नगर– पुणे रस्त्यावर केडगाव बायपास येथे एका टेम्पोने गोवंशीय वासरांची वाहतूक केली जाणार आहे. त्यांच्या सूचनेवरून गुन्हे शोध पथकातील अंमलदारांनी सदर ठिकाणी छापा टाकला असता, केडगाव बायपास येथे एक टेम्पो पुण्याकडून **(पान ३ वर)**

पाहिजेत
नामांकित कंपनीच्या सर्व्हिस सेंटरमध्ये
बॅक ऑफिससाठी
लेडीज त्वरित पाहिजेत.
* कॉम्प्युटरचे ज्ञान अत्यावश्यक
* सावेडी परिसरातील असल्यास प्राधान्य
संपर्क : सेन्चुरिअन मार्केटिंग
9022860233

सर्वरोग निदान व उपचार शिबीर
दररोज स. ११ ते सायं. ५ पर्यंत
खालील आजारांवर सवलतीच्या दरात उपचार केले जातील. गरजू रुग्णांनी अवश्य लाभ घ्यावा.
- मधुमेहावर यशस्वी उपचार केले जातील, ब्लड प्रेशर, संधीवात, मूळव्याध, मुतखडा
- सर्व प्रकारच्या कॅन्सरवर पॅलिएटिव उपचार उपलब्ध पॅरालिसिस, फिट येणे.
- सर्दी, खोकला, दमा, लिव्हरचे आजार
- हाडांचे आजार, डोळ्यांचे आजार इ.
- व्यसनमुक्ती–दारू सोडविण्यासाठी औषध उपलब्ध.
- कानाचे आजार व ऐकू कमी येणारांसाठी कानाचे मशीन मिळेल व इतर सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार केले जातील.
भेटा दररोज स. ११ ते सायं. ४ पर्यंत
अहमदनगर मराठी मिशन हॉस्पिटल,
क्लेरा ब्रुस हायस्कूलसमोर, कोठी रोड, अहमदनगर
डॉ. प्रदीप काळपुंड Mo. 8888386633
डॉ. विजया जाधव अध्यक्षा
डॉ. वसंत खरात Mo.7499890342
डॉ. डी. जी. भांबळ सेक्रेटरी

नमो संवाद सभेत महेंद्र गंधे यांचे सूतोवाच

जनता मोदींनाच पुन्हा कौल देतील

समाचार/नगर-दि.२५

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पंतप्रधानपदाच्या १० वर्षाच्या काळात देशाचा जो विकास केला आहे तो देशाच्या आजपर्यंतच्या इतिहासात झालेला नाही. त्यामुळे काँग्रेसच्या ७० वर्षांतील व मोदींच्या १० वर्षात झालेल्या विकासाची तुलना जनताच करून मोदींना पुन्हा पंतप्रधान करतील यात शंका नाही. आपल्या भागाचे विद्यमान खासदार डॉ.सुजय विखे यांनीही गेल्या पाच वर्षात केलेला विकास सर्वश्रुत आहे. त्यामुळे त्यांचाही विजय निश्चित आहे. मतदारांनी खंडणीखोराला मतदान न करता उच्च शिक्षित व चारित्र्यसंपन्न उमेदवारालाच विजयी करावे, असे आवाहन भाजपाचे विधानसभा निवणूक प्रमुख महेंद्र गंधे यांनी केले.

लोकसभा निवडणुकीतील भाजपाचे उमेदवार खा. विखे यांच्या प्रचारार्थ झालेल्या नमो संवाद सभेमध्ये गंधे बोलत होते. शहर भाजपच्या वतीने बुधवारी सायंकाळी रामचंद्रखुंट, आडते बाजार, तेलीखुंट व नेता सुभाष चौकात झालेल्या नमो संवाद सभांना चांगला प्रतिसाद मिळाला. बाजापेठेतील दुकानदारांच्या भेटी घेवून त्यांना प्रचार पत्रके भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी दिली. यावेळी शहर भाजपचे जिल्हाध्यक्ष ॲड. अभय आगरकर, **(पान ३ वर)**

सरलेल्या वर्षात ३.२ लाख कोटींचे संकलन

जीएसटी संकलनात महाराष्ट्र अव्वल!

मुंबई, दि. २५– वस्तू आणि सेवा कर संकलनात (जीएसटी) महाराष्ट्राने अव्वल स्थान कायम राखले आहे. आर्थिक वर्ष २०२३–२४ मध्ये महाराष्ट्र राज्याने वस्तू व सेवा कर संकलनाचा उच्चांक गाठला असून पहिल्यांदाच ३ लाख कोटींचा टप्पा ओलांडला आहे. सरलेल्या आर्थिक वर्षात ३.२ लाख कोटी जीएसटी संकलन झाले असून गतवर्षीच्या तुलनेत त्यात १८ टक्क्यांची वाढ नोंदवली आहे.

महाराष्ट्र राज्याच्या देशातील एकूण वस्तू व सेवा कर संकलनातील वाटा १६ टक्के राहिला आहे. गतवर्षीच्या तुलनेत (१५ टक्के) त्यामध्ये सुमारे १ टक्क्याची वाढ दिसून येत आहे. तसेच वस्तू व सेवा कर संकलनातील राज्याचा वाढीचा दर (१८ टक्के) हा देशाच्या सरासरी दरापेक्षा (१२ टक्के) अधिक आहे. ही राज्यातील उद्योग, व्यापार यांच्या दृष्टीने जमेची बाजू आहे. राज्यातील आर्थिक व्यवहारातील गतिमानता तसेच वस्तू व सेवा कर विभागाद्वारे महसुल वृद्धीसाठी करण्यात आलेल्या प्रयत्नांमुळे कर संकलनाचा चढता आलेख टिकवून ठेवणे शक्य झाले आहे, अशी माहिती वस्तू व सेवा कर विभागाने दिली.

राज्याच्या निव्वळ महसुलाचा विचार करता, राज्यास जीएसटीतून १,४१,७०० कोटी एवढा उच्चांकी महसूल प्राप्त झाला आहे. राज्य व सेवाकराच्या माध्यमातून (एसजीएसटी) ९३,४०० कोटी तर एकात्मिक कराच्या माध्यमातून ४८,३०० कोटींचा महसूल तिजोरीत जमा झाला. पेट्रोल व मद्य उत्पादनावरील मूल्यवर्धित कराचा महसूल ५३,२०० कोटी राहिला आहे. वस्तू व सेवा कर, मुल्यवर्धित कर, व्यवसाय कर यांच्या एकंदरीत महसुलाचा राज्यातील वृद्धी दर हा ११ टक्के नोंदवला आहे.

अनुभवा पूर्ण नवीन
रेमंड शॉप
अहमदनगर येथे
चला, रेमंडच्या नवीन शोरुम ला भेट द्या सावेडी रोड, अहमदनगर येथे.
आमची फाइन फॅब्रिक्सची नवी श्रेणी पहा, रेडिमेड कलेक्शनमधून मनपसंत निवड करा आणि टेलरिंग ची कमाल अनुभवा.
THE Raymond SHOP
GALAXY
माऊली आर्केड, झोपडी कॅन्टीन जवळ, सावेडी रोड, अहमदनगर ✆0241-6611143

संपादकीय

समस्यांना सामोरे जायचे तर...

एव्हाना पर्यावरणाचा ऱ्हास अपेक्षेपेक्षा जास्त तीव्रतेने होण्यास सुरूवात झाली आहे. सध्या भारतात जाणवणारा तीव्र उन्हाळा किंवा दुष्काळसदृश परिस्थिती पर्यावरणातील असंतुलनाचे दुष्परिणाम असल्याचे सर्वसामान्य माणसाला कळून चुकले आहे. यावर सांगितले जाणारे उपाय म्हणजे कार्बन प्रदूषण कमी करणे, त्यासाठी पेट्रोल व डिझेलवरील वाहनांऐवजी वीज आणि इथेनॉलवर चालणाऱ्या वाहनांना प्राधान्य देणे आणि वनराईखाली भरपूर क्षेत्र आणणे. सर्व जगाने एकवटून या संकटाचा सामना न केल्यास आज आपल्याकडील अनेक शहरांमध्ये एप्रिल महिन्यातच तापमान ४० अंशांच्या पुढे गेले आहे, हे लक्षण आणि अवेळी पाऊस पडण्याची स्थिती तसेच त्यापोटी काढणीला आलेल्या पीकांचे झालेले नुकसान हे दोन्ही फटके पर्यावरणातील असंतुलनामुळे निर्माण झाले आहेत.भारतात स्वातंत्र्यानंतर वने लागवडीसाठी सरकारी स्तरावर जाणीवपूर्वक प्रयत्न केला गेला. झाडे लावण्यासाठी रेकॉर्डवर भारताच्या क्षेत्रफळापेक्षा जास्त क्षेत्रफळाचे खड्डे तयार झाले. परंतु झाडे मात्र लागली नाहीत आणि लागलेली जगलीही नाहीत. आता तर भारतात ही चळवळ पूर्णपणे थंडावली आहे. त्यातील भ्रष्टाचार लक्षात आल्यामुळे आता या प्रश्नी हात घालण्यास कोणीही तयार नाही. या वर्षीच्या हवामानस्थितीचा आढावा घेता लक्षात येते की प्रत्येक महिन्यात अवकाळी पाऊस पडला आहे. याचा अर्थ हंगामी पाऊस झाला नाही, हवा त्या वेळी पिकाला उपयुक्त ठरणारा पाऊस झाला नाही, पण नको तेव्हा भरपूर पाऊस झाला आहे. आताचे ताजे उदाहरण हेच दर्शवते. अलिकडेच विदर्भ आणि मराठवाड्यात गारपीट झाली आणि काढणीस आलेली पीके जमीनदोस्त झाली. असे प्रत्येक महिन्यात घडत आले आहे. याचा फटका शेतकऱ्यांनाच बसला आहे. सरकार प्रत्येक महिन्यात नुकसानीचे पंचनामे करा, मदत दिली जाईल, मदतीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा केली जाईल, अशा घोषणा करुन थकले आहे. दुसरीकडे, शेतकऱ्यालाही या घोषणांमधील फसवणूक पूर्णपणे लक्षात आली आहे.यावर पीक विमा योजना हा एक उतारा असतो. प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा तर बोजवारा उडाला आहे. महाराष्ट्र सरकारने एक रुपयात पीक विमा जाहीर केला, पण तिचाही बोजवारा उडाला आहे. या दोन्ही योजनांमध्ये महाराष्ट्रातील कोणत्याही शेतकऱ्याला त्याच्या हानीइतकी रक्कम किंवा त्याचे समाधान करु शकणारी भरपाई मिळाल्याचे ऐकिवात नाही. तसे पाहता हे अस्मानी-सुलतानी संकट आहे. कोणतेही सरकार कितीही घोषणा करत असले तरी या संकटाला पुरे पडू शकत नाही. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी सरकारकडून अपेक्षा न बाळगता काही वेगळ्या उपाययोजना करुन या संकटावर मात केली पाहिजे. पहिली बाब म्हणजे, आता शेतकऱ्यांनी हंगाम विसरले पाहिजेत. पूर्वीसारखा पावसाळा, हिवाळा, उन्हाळा हे ऋतू आणि परंपरा विसरली गेली तरच या संकटावर मात होऊ शकते. पाऊस कधीही पडू शकतो, हे गृहीत धरुन शेतकऱ्यांनी कमी दिवसांमध्ये येणाऱ्या पिकांवर भर दिला पाहिजे. म्हणजे पाऊस कधीही आला तरी शेतकऱ्यांना त्याचा फायदा उठवता येईल. शेतकऱ्यांना बसणाऱ्या हवामानाच्या फटक्याची तीव्रता कमी करण्याचा दुसरा उपाय म्हणजे भूमीअंतर्गत पाण्याची तळी निर्माण करणे. सध्या प्लास्टीकच्या सहाय्याने तळी निर्माण केली जातात. ती उघड्यावर असतात. साहजिकच जवळपास ४० टक्के पाण्याचे बाष्पीभवन होते. परंतु, भूमीअंतर्गत तलाव असल्यास हे ४० टक्के पाणी वाचते. त्याला तुषार आणि ठिबक पद्धतीची जोड देता येईल. शेवटी पाण्याचा एक एक थेंब वाचवणे गरजेचे आहे. आता उघड्यावरील शेततळ्याला शंभर टक्के अनुदान आहे. भूमीअंतर्गत तलावालाही ते मिळायला हवे.याचा अर्थ सरकारचे पाणी धोरण पर्यावरणातील तीव्र बदल लक्षात घेऊन बदलले पाहिजे. केवळ मोठमोठी धरणे बांधणे, त्यातील गाळ काढणे किंवा पाणी अडवा, पाणी जिरवा, पाऊस पकडा, पाणी साठवा यापेक्षा वेगळे उपाय योजायला हवेत. या धोरणांमध्ये अद्याप भूमीअंतर्गत धोरणाचा समावेश झालेला नाही. वाढत्या तापमानामुळे शेतकऱ्याच्या आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होणार आहे. उन्हात काम करावे लागल्यामुळे स्ट्रोक, उष्माघाताचे बळी वाढण्याची मोठी शक्यता आहे. त्यापासून संरक्षणाचे उपाय म्हणजे कान आणि डोक्यांचे संरक्षण करणे. त्यासाठी पूर्वीची फेटा पद्धत शेतकऱ्यांनी पुन्हा अवलंबली पाहिजे. तसेच वैद्यकीय उपाय उपलब्ध करुन द्यायला हवेत. त्याचप्रमाणे वाढत्या उष्म्यापासून पिकांचेही संरक्षण करायला हवे. हे तंत्र म्हणजे हरितगृह किंवा प्लास्टीक हाऊसेस हे आहे. यामध्ये पर्यावरण बदलामुळे पुढे येणारे सर्व प्रकारचे धोके टळू शकतात. चीन सरकारने पर्यावरणाच्या याच धोक्यांचा विचार करुन शेतकऱ्यांना हरितगृह आणि प्लास्टीक हाऊसेस फुकट उपलब्ध करुन दिली असल्यामुळे त्यांचे उत्पन्न आपल्यापेक्षा तिपटीने वाढले आहे. कारण याच्या सहाय्याने पर्यावरण नियंत्रण करता येते आणि पिकांच्या आरोग्याची काळजीही घेता येते. हे तंत्रज्ञान इस्त्रायल तसेच इतर अनेक देशांनी अवलंबल्यामुळे पर्यावरणातील बदलांमुळे त्यांच्या शेतीचे नुकसान टळले आहे. भारतालाही शेती टिकवायची असेल तर त्याच मार्गाने जावे लागेल. केवळ घोषणा नको तर अंमलबजावणीही व्हायला हवी. त्यासाठी तंत्रज्ञानाचा उपयोग हेच वरदान ठरणार आहे.

शालेय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत 'न्यू आर्टस्' विजेता

समाचार/नगर-दि.२५

अमरावती येथे झालेल्या शासकीय राज्य शालेय टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेत नगरच्या न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेजच्या १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या संघाने सर्वोत्तम कामगिरी करून मुंबई विभाग, अमरावती विभाग व अंतिम सामन्यात नाशिक विभागाचा अतिशय चुरशीच्या सामन्यात सुपर ओव्हर मध्ये ७ धावांनी पराभव करून राज्यात प्रथम क्रमांकाचे विजेतेपद पटकावले. या संघाची राष्ट्रीय स्तरावर होणाऱ्या स्पर्धे साठी निवड झाली आहे.

संघाचा कर्णधार म्हणून शिवम शिंदे, उपकर्णधार प्रणित मळेकर, तेजस बडे, संग्राम पाटील, कृष्णा दळवी, स्वराज पारे, आदेश पिंपरकर, ओम बेरड, दर्शन मुनोत, कार्तिक फरे, ऋषिकेश निंबाळकर, ओम गुंजाळ या खेळाडूंचा समावेश होता. त्यांना क्रिडा शिक्षक प्रा. सुधाकर सुंबे व प्रा. आकाश नढे यांचे मार्गदर्शन लाभले.

या यशाबद्दल जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, सचिव ऑड. विश्वासराव आठरे पाटील, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, खजिनदार दिपलक्ष्मी म्हसे, सहसचिव जयंत वाघ तसेच ज्येष्ठ विश्वस्त जी. डी. खानदेशी, सिताराम खिलारी, मुकेश मुळे, प्राचार्य डॉ. बी. एच. झावरे, उपप्राचार्य प्रा. कल्पना दारकुंडे, पर्यवेक्षक प्रा सुभाष गोरे यांनी विजेता खेळाडूंचे अभिनंदन करुन पुढील राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

श्री मळाई देवी यात्रोत्सवास प्रारंभ

समाचार/नगर-दि.२५

पारनेर तालुक्यातील चिंचोली येथील श्री मळाई देवीला हळद लावण्याचा कार्यक्रम मंगळवार दि.२३ एप्रिल रोजी महिलांच्या उपस्थितीत पार पडला. चिंचोली गावातून मंदिरापर्यंत कळस मिरवणूक कार्यक्रम पार पडला. त्यानंतर मळाई देवीची विधीवत पूजा करण्यात आली व सुवासिनी महिलांनी देवीची पूजा करून हळद लावली. यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. मंदिराजवळ काठी उभारण्यात येऊन यात्रोत्सवास सुरुवात झाली.

मळाई देवीची वार्षिक यात्रा मंगळवार दि.३० रोजी काठी, पालखी, छबिना मिरवणूक व विविध कार्यक्रमाने संपन्न होणार आहे. या यात्रोत्सवासाठी मळाई वडजाई देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थ भाविकांना सुविधा पुरविण्यासाठी प्रयत्नशील आहेत. सर्व मानकरी व भाविकांनी कुलदैवतेच्या यात्रोत्सवात सहभागी व्हावे, असे आवाहन देवस्थान ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे.

श्रीरामाला 'सूर्यतिलक'

विज्ञान भारती

या वर्षीची रामनवमी सर्व देशवासीयांसाठी अत्यंत अविस्मरणीय व हटकेच ठरली. एक तर ५०० वर्षानंतर देशवासीयांनी ज्यांच्यावर उदंड प्रेम केले असे प्रभू श्रीराम स्वतःच्या मंदिरात विराजमान झाले व त्यानंतरची ही पहिलीच रामनवमी. दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे श्रीरामांना सूर्यकिरणांचा अभिषेक ठिक दुपारी बारा वाजता घालण्यात आला.

खरे तर आपल्या भारतातील काही मंदिरात अशी वैशिष्ट्यपूर्ण रचना केली आहे, जेणेकरून सूर्य आपल्या किरणांचा अभिषेक मूर्तीवर करू शकतो. याच संकल्पनेवर श्रीरामांचे मंदिर तयार होत असतानाच अशी व्यवस्था करण्यात आली होती. यामुळेच आता दर रामनवमीला श्रीरामांना 'सूर्यतिलक' लावण्यात येणार आहे.

श्रीराम जन्मभूमी न्यासाने याकरता सेंट्रल बिल्डिंग रिसर्च इन्स्टिट्यूट या संस्थेची मदत घेतली या संस्थेने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ अस्त्रोफिजिक्स व ऑप्टिका या कंपन्यांच्या सहाय्याने हे एक हटके काम पूर्ण केले. Optics and -llied Engineering Pvt Ltd (Optica) या कंपनीने यातील महत्त्वपूर्ण आरसे व लेंसेस तयार केले. यांच्या मदती मुळेच 'सूर्यतिलक' यशस्वी झाला

आपण शाळेमध्ये पेरिस्कोप बनवला केव्हा शिकलो आहोत. शक्यतो पाणबुडी ह्या अश्या प्रकारच्या पेरिस्कोप वापरतात. यामध्ये पाणबुडी जरी समुद्राच्या आत असेल तरी त्यांना समुद्राच्या वर काय हालचाली चालल्यात, या पेरिस्कोप मार्फत कळू शकतात. अगदी तशाच प्रकारचे तंत्रज्ञान या ठिकाणी वापरण्यात आले व तिसऱ्या मजल्यावरील आरशांवर पडलेली सूर्यकिरणे गर्भगृहातील रामलल्लाच्या कपाळी आणण्यात आली.

याकरता एक इंग्रजी न आकाराची पायपिंग बनवण्यात आली. या पायपिंग मध्ये पितळ, कास्य व टायटॅनियम हे धातू वापरण्यात आले. या मंदिराचे वैशिष्ट्य म्हणजे या ठिकाणी लोखंड हा धातू वापरला नाही, कारण आपल्याला माहितीये लोखंड हे गंजते.

रामनवमीच्या दिवशी तिसऱ्या मजल्यावरील आरसांवर जी सूर्यकिरणे पडली ती ९० अंशामध्ये परावर्तित करून या पितळेच्या पाईपमध्ये पाठवली गेली. या पाईपच्या दुसऱ्या टोकाला असलेल्या आरसाने ती सूर्यकिरणे परत ९० डिग्री मध्ये परावर्तित केली व त्या पाईप मधून खालच्या आरसाकडे पाठवली.

हि सूर्यकिरणे खाली जाताना एकूण तीन वेगवेगळ्या लेंसेस मधून गेली. ही लेंसेस या सूर्य किरणांची तीव्रता व एकीकरण वाढवते. ती खाली आल्यावर पुन्हा एकदा गर्भगृहातील आरसावर पडली व परत एकदा ९० डिग्री मध्ये ती परावर्तित झाली. हि परावर्तित सूर्यकिरणे श्रीरामलल्लाच्या कपाळावर अगदी बरोबर केंद्रीत करण्यात आली व 'सूर्य तिलक' लावण्यात आला. तीन ते चार मिनिटांचा हा कार्यक्रम अगदी ठरल्याप्रमाणे झाला. सर्वसाधारणपणे ७५ मिलिमीटर इतका गोल रामलल्लाच्या कपाळी स्थिरावला. अनेक पॅनल स्क्रीनवर याचे प्रक्षेपण होत होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुद्धा याचा आनंद घेतला. अश्या प्रकारच्या यंत्रणेला ऑप्टो- मेकॅनिकल प्रणाली म्हणतात. यामध्ये हे आरसे व लेंसेस या पाईपमध्ये फिट केलेले असतात. यांच्यामध्ये काही गिअर सुद्धा असतात आणि या गिअर्स काम असे कि या आरसे व लेंसेसवर योग्य दिशेने किरणे पडावीत म्हणून काम करणे. ती तशी पडत नसतील तर त्यांना योग्य अँगल देणे. एकूण १९ गियर या सिस्टीम मध्ये लावण्यात आलेली आहेत.

थोडक्यात काय दर रामनवमीला आपण अश्या प्रकारे 'सूर्य तिलक' लावणार आहोत. आपल्याकडे तिथी पुढे मागे होती, तरीसुद्धा ही ऑप्टो मेकॅनिकल प्रणाली अशी बनवण्यात आली आहे कि सूर्याची किरणे राम लल्लाच्या कपाळावर बरोबर बारा वाजता लावता येईल. आपल्या पारंपारिक व आधुनिक संस्कृतीचा या निमित्ताने एक सुंदर मिलाफ सर्व भारतीयांना पाहायला मिळाला.

- डॉ.दत्ता पोंदे

मोबाईल- ७३८७९००७००

राशीभविष्य

- **मेष** : महत्त्वाच्या भेटीने दिलासा मिळेल. व्यवसायात सुधारणा होईल. स्थावर प्रश्नातून मार्ग निघेल.
- **वृषभ** : हाती घेतलेली कामं विनासायास होतील. खर्चाचं प्रमाण वाढतं राहील. मुलांची प्रगती होईल.
- **मिथुन** : प्रवासाचा उद्देश सफल होईल. नोकरीचे प्रयत्न सुरू ठेवावे. उपजत कलागुणांचा विकास होईल,
- **कर्क** : कोणताही निर्णय घाईने घेऊ नका. कार्यात एकाग्रता महत्त्वाची ठरेल. प्रवासात काळजी घ्यावी.
- **सिंह** : मोठी खरेदी उत्साहात होईल. विजेच्या उपकरणांपासून सावध रहावं. आर्थिक समस्या संभवतात.
- **कन्या** : स्वकर्तृत्त्वावर पूर्ण विश्वास ठेवा. नोकरीत नव्या जबाबदाऱ्या येतील. प्रियजनांचा सहवास लाभेल.
- **तूळ** : विचारांची दिशा निश्चित ठेवा. विचलित करणाऱ्या घटना संभवतात. पुरेसा संयम बाळगायला हवा.
- **वृश्चिक** : नोकरीत आनंदवार्ता समजेल. कलाकारांना उत्तम संधी लाभतील. हातून धार्मिक कार्य घडेल.
- **धनु** : अपेक्षित फलप्राप्ती होईल. पित्ताचे विकार संभवतात. व्यवसायात नवे करार मार्गी लागतील.
- **मकर** : खऱ्या हितचिंतकांची पारख करा. दुसऱ्यावर अवलंबून राहणं नको. विचारपूर्वक पावलं टाका.
- **कुंभ** : छोटा-मोठा प्रवस घडेल. चैनीवर अधिक खर्च होईल. विवाहाच्या प्रश्नात तडजोड करावी लागेल.
- **मीन** : व्यापारवृध्दीस अनुकूलता राहील. घरगुती वाद वेळीच दूर करावे. मानसिक अस्वास्थ्य राहील.

दिन विशेष

२६ एप्रिल

१९२० : भारतीय गणितज्ज्ञ श्रीनिवास रामानुजन यांचा मृत्यू.

२०१५ : भूकंपाच्या तीव्र हादऱ्यांमुळे नेपाळ उद्ध्वस्त.

२०१७ : राजस्थान विधानसभेत गोंधळ घालणाऱ्या काँग्रेसच्या बारा आमदारांना वर्षभरासाठी निलंबित करण्यात आलं.

२०१८ : उत्तर प्रदेशातील कुशीनगर इथे मानवरहित रेल्वेक्रॉसिंगवर पॅसेंजरने स्कूल व्हॅनला उडवलं. १३ विद्यार्थी ठार, आठ जखमी.

आरोग्यमंत्र

मिळेल बळकटी

हृदयविकाराने ग्रस्त रुग्णांची वाढती संख्या ही सध्याची सर्वाधिक चिंतेची बाब आहे. तरुण वयात हा विकार जडणाऱ्यांची मोठी संख्याही काळजी वाढवते. हार्ट ॲटॅक आल्यानंतर हृदयाचे स्नायू आणि पेशी कमकुवत होतात. यामुळे हृदयात विद्युतलहरींचा प्रवाह धीम्या गतीने वाहतो. हृदयक्रिया मंदावते. हृदयाच्या अशा कमकुवत स्नायूंना बळकटी देण्याच्या दृष्टीने शास्त्रज्ञांनी एक पॉलिमर पॅच विकसित केला आहे. त्याच्या मदतीने हृदयविकाराच्या झटक्यामुळे हानी पोहोचलेल्या हृदयाच्या टिश्यूंची कार्यक्षमता वाढू शकते. संशोधकांच्या म्हणण्यानुसार, या पॅचमुळे हानी पोहोचलेल्या टिश्यूंची कार्यक्षमता खात्रीने वाढेल. सहाजिकच हृदयातला विद्युतलहरींचा प्रवाह सुरळीत सुरू राहील. हा पॅच बराच काळपर्यंत टिकून राहू शकतो. हे संशोधन अनेक अर्थांनी उपयुक्त ठरू शकतं. या पॅचची निर्मिती हृदयरुग्णांसाठी वरदान ठरू शकेल. वैद्यकशास्त्राच्या दृष्टीने हे खूप मोठं यश असल्याचं या क्षेत्रातील तज्ज्ञांचं म्हणणं आहे. हा पॅच बसवण्यासाठी टाके घालावे लागत नाहीत. त्यामुळे रुग्णांना वेदना सहन कराव्या लागत नाहीत. मध्यंतरीच प्राण्यांवर या पॅचचा प्रयोग करण्यात आला आहे. तो यशस्वी ठरल्याने आता शास्त्रज्ञांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. माणसांनाही याचा लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. हा पॅच तयार करण्यासाठी तीन घटकांचा वापर करण्यात आला आहे. यात चिटोसेन फिल्म बसवण्यात आली आहे. लवकरच याचा वापर सुरू होईल.

नोंद घ्या

अनोखा उत्सव

कर्नाटकातल्या मंगळूरूपासून २६ किलोमीटर अंतरावर दुर्गा परमेश्वरीचं एक मंदिर आहे. 'अग्निकेली स्पर्धा' हे इथलं खास वैशिष्ट्यं आहे. अग्निकेली म्हणजे एकमेकांवर पेटत्या मशाली फेकणं. या मंदिरात आठ दिवसांचा अग्निकेली उत्सव साजरा होतो. आतुर आणि कलत्तुर या दोन गावातले लोक या उत्सवात सहभागी होतात. त्यांच्यामध्ये ही स्पर्धा रंगते. उत्सवाआधी वाजत गाजत दुर्गा परमेश्वरी देवीची मिरवणूक काढली जाते. यानंतर स्पर्धेत सहभागी होणारे भाविक जवळच्या तलावात आंघोळ करतात आणि मग या काहीशा विचित्र वाटणाऱ्या पण अनोख्या परंपरेला सुरूवात होते. स्पर्धेला सुरूवात होण्यापूर्वी या गावातल्या लोकांचे संघ तयार केले जातात. अग्निकेलीसाठी नारळाच्या बाहेरच्या भागाचा वापर करून खास मशाली बनवलेल्या असतात. स्पर्धेत सहभागी होणारे लोक या मशाली घेऊन समोरासमोर उभे राहतात. मग जळत्या मशाली एकमेकांवर फेकल्या जातात. ही स्पर्धा १५ मिनिटं सुरू राहते. एक स्पर्धक केवळ पाच वेळाच मशाली फेकू शकतो.

ग्रुमिंग

बिनधास्त वापरा दागिने

मित्रांनो, आता दागिन्यांचा वापर फक्त मुलींपुरता मर्यादित राहिलेला नाही. आता मुलंही अंगावर दागिने मिरवताना दिसतात. मोजके पण आकर्षक दागिने घालणं हा सध्याच्या काळातला ट्रेंड आहे. क्रिकेटपटू, बॉलिवूड अभिनेते तसंच अन्य क्षेत्रातल्या सेलेब्ज वैविध्यपूर्ण दागिने घालून फिरताना दिसतात. तुम्हीही दागिन्यांचे काही प्रकार वापरू शकता. अर्थात सुरूवातीला थोडं विचित्र वाटलं तरी सवयीने तुम्हाला दागिने नक्कीच आवडतील. तेव्हा कोणत्या दागिन्यांपासून सुरूवात करता येईल हे जाणून घ्या. सर्वप्रथम तुम्ही सोनं, चांदी किंवा प्लॅटिनमच्या चेन घालू शकतो. हार्दिक पंड्या आणि रणवीर सिंह अशी चेन घालून मिरवतात. तुम्हीही एखादी चेन करून घेऊ शकता. बीडेड म्हणजे मण्यांचं ब्रेसलेट हा सुद्धा एक चांगला पर्याय आहे. त्यामुळे व्यक्तिमत्त्व अधिक रुबाबदार करण्यासाठी असे ब्रेसलेट अवश्य वापरा. सोनं किंवा चांदीचं ब्रेसलेट घालण्याऐवजी आकर्षक आणि ट्रेंडी असं मण्यांचं ब्रेसलेट वेगळाच लूक देऊन जाते हे लक्षात घ्या.

पंचांग

शुक्रवार, २६ एप्रिल २०२४

क्रोधीनाम संवत्सर, शके १९४६,
चैत्र कृ. २, नक्षत्र : अनुराधा,
चंद्रराशी : वृश्चिक, वरियान योग
सूर्योदय ६.१६, सूर्यास्त : १८.५७

फॉरवर्डस

विरहाच्या काळात स्वत:लाच दिलासा द्यावा लागतो...

दिन हुआ हैं
तो रात भी होगी,
मत हो उदास
उससे कभी बात भी होगी

स्मार्ट टॉक

वेबसर्च करण्यासाठी क्रोम ब्राउजरचा सर्वाधिक वापर होतो. गुगल क्रोम हे आजचं आघाडीचं ब्राउजर आहे. क्रोम मुळातच स्मार्ट आहे. यासोबतच यातले विविध फीचर्स त्याला जास्तच स्मार्ट बनवतात. गुगल क्रोमच्या या फीचर्सविषयी जाणून घेऊन तुम्ही स्मार्ट ब्राउजरचा वापर अधिक चांगल्या पद्धतीने करू शकता. उदाहरणार्थ, सायबर कॅफेत जाऊन किंवा इतरांच्या मोबाईल/पीसीवरून वेबसर्च करत असाल तर सावध राहायला हवं. यासाठी गुगलचं इनकॉगनिटो फीचर कामी येऊ शकतं. हे फीचर ब्राउजरच्या मेन्यूमध्ये असतं. यामुळे तुमची सर्च हिस्ट्री कुणी बघू शकत नाही.

करिअरवाटा

समाजोपयोगी क्षेत्र

फार्मसी हे कारकिर्दीच्या दृष्टीने उत्तम क्षेत्र असून इथे युवावर्गाला आकाशाएवढी उंची गाठता येते. विशेषत: या विषयात पीएच.डी. मिळवली तर नवं संशोधनाच्या रुपानं फार्मासिस्ट समाजाची आणि मानवतेची सेवा करु शकतो. पर्यावरणात बदल होत गेल्यानंतर औषधं निरुपयोगी ठरु लागतात. काही रोगांचे जंतू स्वत:वर औषधांचा परिणाम होणार नाही असा बदल घडवतात. त्यामुळेही औषधांचं पुनर्निमाण करावं लागतं. एखादं औषध शोधल्यानंतर त्याच्या खूप चाचण्या घ्याव्या लागतात. आधी त्या प्राण्यांवर घेतल्या जातात आणि धोकादायक नसल्याची खात्री पटल्यानंतर माणसांवर चाचण्या घेतल्या जातात. ते औषध माणसाला गुणकारी आहे हे सिद्ध झाल्यानंतर त्याचं फॉर्म्युलेशन करावं लागतं. ते द्रवरुपात द्यावं, इंजेक्शन म्हणून द्यावं की गोळीच्या स्वरुपात द्यावं यावर बरंच काम करावं लागतं आणि नंतरचं ते बाजारात येतं. इंजेक्शन, गोळी किंवा पातळ औषध तयार करताना त्यात विशिष्ट औषधी घटकाशिवाय कोणती द्रव्यं वापरावी, किती प्रमाणात वापरावी याचाही विचार करावा लागतो. ही सारी कामं फार्मासिस्ट करतात. त्यामुळे संशोधन करू शकणाऱ्या फार्मासिस्टांची मोठी गरज आहे हे लक्षात घ्यायला हवं.

खेचाखेची

किंमत कळणार नाही

नवऱ्याने बायकोला केलेला एक भावपूर्ण मेसेज...

.
.
.
.
.
.
.

माझं प्रेम राफेल विमानासारखं आहे...
शेवटपर्यंत तुला किंमत कळणारच नाही.

बालमानस

पाण्याला चव असते असं म्हटलं तर तुम्ही सहमत असाल? हो, आपल्यापैकी अनेकांनी बोअरच्या पाण्याची चव चाखली असेल तर त्यांना निश्चितच फरक जाणवला असेल. हे पाणी काहीसं खारट लागतं. यालाच आपण जड पाणी अर्थात हार्ड वॉटर असं म्हणतो. मित्रांनो, उन्हाळ्याच्या दिवसात जमिनीखालील पाण्याची पातळी आणखी खोल जाते. या पाण्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम यासारखे बरीचशी खनिजं मिसळतात. आजूबाजूच्या दगडमातीमध्ये असणारी ही खनिजं मिसळल्यामुळे हे पाणी काहीसं खारं आणि पचायला जड बनतं. म्हणूनच या पाण्याला विशिष्ट प्रकारची चव लागते.

फॅशन पॅशन

कुर्ता इन स्टाईल

कधीकाळी पुरुषांची मक्तेदारी असणारा कुर्ता स्त्रियांच्या पेहराव श्रेणीत कधी सामावला हे समजलंही नाही. आता बाजारात स्टायलिश कुर्त्यांची मोठी रेंज बघायला मिळते. जाणून घेऊ या या ट्रेंडविषयी...

✻ असिमिट्रिक कुर्ता - सगळ्यांमध्ये उठून दिसायचं तर हा कुर्ता मस्ट आहे. बेल्टच्या सहाय्याने या कुर्त्याला खास लूक देता येतो. जीन्स, लेगिंग्ज किंवा जेगिंग्ज यापैकी कशासोबतही हा कुर्ता मॅच होतो. ✻ अंगरखा स्टाईल कुर्ता - सध्या जुन्या काळातले अंगरखे कुर्त्यांच्या स्वरुपात समोर येत आहेत. डेली वेअर, फॉर्मल वेअर किंवा पार्टी वेअर अशा कोणत्याही प्रकारात हा पॅटर्न उपलब्ध आहे. गरजेनुसार उंची कमी-जास्त करता येते. ✻ शर्ट कुर्ता - ऑफिससाठी हा कुर्ता सर्वोत्तम पर्याय आहे. ✻ जॅकेट कुर्ता - आजकाल जॅकेटची क्रेझ आहे. रॉयल लूकसाठी भरजरी जॅकेटचा उपयोग करता येतो. कुर्त्यावर जॅकेटचा उपयोग केल्यास युनिक लूक मिळण्यास मदत होते. कॉटन, क्रेप, जॉर्जेट, लायक्रा आदी फॅब्रिकमध्ये जॅकेट्स उपलब्ध आहेत. ✻ मँडेरिन कॉलर - एलिगंट लूक मिळवायचा असेल तर हा कुर्ता सर्वोत्तम पर्याय आहे.

Printed and Published by: Swati Mahendra Kulkarni, Printed at "Samachar" 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist.Ahmednagar, Pin Code - 414 001, Maharastra, Published at 4188, Maidan Aad, Ahmednagar(M Corp), Dist Ahmednagar, Pin Code- 414 001, Maharashtra. Editor- Swati Mahendra Kulkarni, Phone - (0241) 2345270, 2347086, Mob.- 9822470074.
हे मराठी सायंदैनिक, मुद्रक, प्रकाशक स्वाती महेंद्र कुलकर्णी यांनी ''समाचार'' ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प), जिल्हा-अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे मुद्रित करून ४१८८, मैदान आड, अहमदनगर (एम कॉर्प) जिल्हा- अहमदनगर, पिन कोड- ४१४ ००१, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक- स्वाती महेंद्र कुलकर्णी.
दूरध्वनी- २३४५२७०, २३४७०८६, मो.- ९८२२४७००७४ E-mail - mahendra.samachar@gmail.com

समाचार

गुरुवार, दि. २५ एप्रिल २०२४ पान ३

सुविचार

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे साधन आहे आणि शिस्त हा राष्ट्राचा आत्मा आहे. **संकलित**

सामान्यज्ञान

विमानांची पहिली टक्कर ७ एप्रिल १९२२ मध्ये झाली दोन्ही विमाने फ्रेंच एअरलाईनची होती.

संकलन - अरविंद ब्राम्हणे

उन्हाळी शिबिराची उत्साहात सांगता

'धूत' 'मानधना' मधील मुलांनी लुटला विविध खेळांचा आनंद

समाचार/नगर-दि.२५

श्रीरामकृष्ण एज्युकेशन फाउंडेशनचे सेठ नंदलाल धूत इंग्लिश मीडियम स्कूल व मोहनलाल रामावतार मानधना कनिष्ठ महाविद्यालयामध्ये रोटरी क्लबऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या अध्यक्षा देविका रेले यांच्या उपस्थितीत उन्हाळी शिबिराची सांगता

मुलांना आपण आपल्या कामात व्यस्त असताना मुलांना मोबाइल न देता कुठे सक्रिय ठेवावे यासाठीच विद्यालयात दहा दिवसीय उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये चिमुकल्या मुलांनी शिव मल्हार गडावर ट्रेकिंग करून तसेच संकेत फॉर्म वर मनसोक्त खेळून मनमुराद आनंद लुटला. हॉर्स रायडिंग, थ्रीडी शो, मॅजिक शो, पपेट शो तसेच विद्यार्थ्यांनी चित्रकला हस्तकला संगीत नृत्य या सर्व उपक्रमांमध्ये सहभाग घेऊन सुप्त कलागुणांना प्रकट करून स्वच्छंदीपणे उन्हाळी शिबिरात सहभाग नोंदवला याबरोबरच विद्यार्थ्यांना सकाळी शिबिरात आल्याबरोबर संस्कारमय वातावरणात स्तोत्र तसेच बोधपर गोष्टी सांगून त्यांचे मनोरंजनही करण्यात आले उन्हाळी शिबिराचे महत्त्वपूर्ण आकर्षण म्हणजे पालक आणि विद्यार्थी यांच्यासाठी आयोजित केलेला भारतीय संस्कृतीवर आधारित फॅशन शो यामध्ये पालकही सहभागी झाल्यामुळे आपल्या पाल्याबरोबर आपल्याला वेळ देता आला याचा आनंद पालकांना समाधान देऊन गेला तसेच पालक आणि विद्यार्थी साठी आयोजित केलेले विविध खेळ या उपक्रमातही सर्वांनी अतिशय उत्साहाने सहभाग घेतला. रोटरी क्लब ऑफ अहमदनगर प्रियदर्शनीच्या अध्यक्षा देविका रेले, गोपाल धूत यांनी मार्गदर्शन केले. मनोगतात म्हणाले की विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्थाचालक नेहमीच क्रियाशील असतात विद्यार्थ्यांनी जास्तीत जास्त सहभाग घेऊन आपला सर्वांगीण विकास करावा तसेच शिबिरामध्ये विद्यार्थ्यांनी अतिशय उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला त्याबद्दल त्यांचे आणि पालकांचे कौतुक केले.

विद्यालयाच्या प्राचार्या राधिका जेऊरकर यांनी दहा दिवसाच्या शिबिराच्या आढाव्याचे वाचन केले. यावेळी उपाध्यक्ष मोहनलाल मानधना, राजेश झंवर, संस्थेचे सचिव डॉक्टर शरद कोलते, सहसचिव बजरंग दरक, संस्थेचे सभासद नंदकिशोर शहा, रवींद्र गुजराती, पुरुषोत्तम भाई पटेल, रामसुख मंत्री, श्रीगोपाल जाखोटिया, अरुण झंवर, प्रतिभा धूत, विद्यालयाच्या प्राचार्या राधिका जेऊरकर, समन्वयक अंजना पंडित, संपदा देशपांडे उपस्थित होत्या. आणि संस्थेचे उपाध्यक्ष नंदकुमार झंवर यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या.

कारखानदार त्रस्त; मनपा आयुक्तांना निवेदन

केडगाव इंडस्ट्रियल इस्टेटमध्ये ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर

समाचार/नगर-दि.२५

केडगाव येथील इंडस्ट्रीयल इस्टेट येथील ड्रेनेजलाईनची अवस्था अत्यंत दयनीय झाली आहे. याबाबत वेळोवेळी तक्रारी करून त्याची दुरुस्ती झालेली नाही. त्यामुळे ड्रेनेजचे पाणी रस्त्यावर वाहत असून कारखानदार व कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे येथील ड्रेनेज लाईनचे काम करण्याबाबत तात्काळ उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केडगाव येथील इंडस्ट्रियल इस्टेटच्या वतीने महापालिका आयुक्तांकडे करण्यात आली आहे.

मागील वर्षी इंडस्ट्रीयल इस्टेटमधील बोथरा फॉंड्री ते ए.डी.एम. मोटर्सपर्यंतच्या ड्रेनेजलाईनचे काम महापालिकेमार्फत झाले होते. त्यावेळी इतर ड्रेनेज लाईनचे काम लवकरच होईल, असे सांगण्यात आले होते. मात्र, अद्यापही काम चालू केले नाही. वसाहतीमधील सर्व ड्रेनेजलाईन या ३० ते ३५ वर्ष जुन्या आहेत. प्रत्येक लाईनला अडचणी आहेत. काही चेंबर तुटलेले आहेत. तर काही ठिकाणी पाणी रस्त्यावर वाहत आहे. या ड्रेनेजच्या समस्येमुळे येथील सर्व कारखानदार त्रस्त आहेत. कामगार व कारखानदारांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे. सर्व कंपन्यांमध्ये ड्रेनेजचे पाणी परत येत आहे. महापालिकेला कळवल्यावर ते जेटिंग मशिनद्वारे उपाययोजना करतात. मात्र, आजही समस्या कायम आहे. त्यामुळे आपण स्वतः इंडस्ट्रीयल इस्टेटला भेट द्यावी व कारखानदारांना होणाऱ्या या समस्येतून मुक्त करण्यासाठी उपाययोजना कराव्यात. सुप्रिम ॲटोपासून आझाद सॉमिलपर्यंत, चोपडा पॉली प्रॉडक्ट्स पासून ते ॲटो इंजिनिअर्स पर्यंत, नेक टेक्निकल पासून गौरी इंडस्ट्रीजपर्यंत ड्रेनेज लाईचे काम करावे, अशी मागणी महापालिकेकडे करण्यात आली आहे.

जालिंदर बोरूडे यांना समाजभूषण पुरस्कार

समाचार/नगर-दि.२५

फिनिक्स सोशल फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांना जनकल्याण फाउंडेशनच्या वतीने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज समाजभूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. बोरुडे फिनिक्स सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून गेल्या ३१ वर्षापासून शिबिर घेऊन हजारो गोरगरीब नेत्रदोष असलेल्या रुग्णांना मोफत मोतिबिंदू शस्त्रक्रिया घडवून आणल्या असून, या सेवेच्या माध्यमातून अनेकांना नवदृष्टी मिळाली आहे. तर नागरिकांना मरणोत्तर नेत्रदानासाठी प्रोत्साहित करुन अनेकांचे मरणोत्तर नेत्रदान घडवून आणले आहे. या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पुरस्कार जाहीर करण्यात आले असल्याची माहिती जनकल्याण फाउंडेशनचे अध्यक्ष पांडुरंग रोडगे व सचिव सुरेश रोडगे यांनी दिली.

नगर जिल्हा रूग्णालय परिसरातील अतिक्रमणे हटवली

समाचार/नगर-दि.२५

जिल्हा रुग्णालय परिसरातील प्रवेशद्वाराजवळील व रुग्णालयाच्या आवारात असलेली टपऱ्यांची अतिक्रमणे महापालिका प्रशासनाने कारवाई करून हटवली. झेंडीगेट प्रभाग कार्यालयाचे प्रभाग अधिकारी अशोक साबळे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने बुधवारी ही कारवाई केली. पत्रकार चौकातील जिल्हा रुग्णालय व त्यालगत मोठ्या प्रमाणावर पादचारी मार्गावर अतिक्रमणे थाटण्यात आली आहेत.

तसेच, जिल्हा रुग्णालयाच्या आवारातही टपऱ्या लावण्यात आल्या आहेत. या सर्व अतिक्रमणांवर महापालिकेच्या पथकाने कारवाई केली. प्रभाग अधिकारी साबळे, क्षेत्रीय अधिकारी देविदास बिज्जा यांच्या पथकाने ही कारवाई केली.

पान १ वरुन

प्रीतम यांना नाशिकमध्ये उभे करू- पंकजा मुंडे

उमेदवार देण्याची वेळ आली तर नाशिक लोकसभा मतदारसंघातून महायुतीकडून तीन उमेदवार इच्छुक असल्याचीही माहिती मंत्री छगन भुजबळ यांनी दिली. नाशिक लोकसभा मतदारसंघात पंकजा मुंडे यांनी प्रीतम मुंडे यांना उभे करु, असे वक्तव्य काल बीड येथे केले. त्यानंतर छगन भुजबळ म्हणाले, पंकजा मुंडे यांनी बीड लोकसभा मतदारसंघात लक्ष घालावे. १३ तारखेला निवडणूक आहे. त्यांना निवडून यावे लागेल. यासाठी त्यांनी प्रयत्न करावे, असा सल्ला भुजबळांनी दिला.

जनता मोदींनाच पुन्हा कौल देतील

शिवसेना जिल्हाप्रमुख बाबुशेठ टायरवाले, माजी महापौर बाबासाहेब वाकळे आदींसह मोठ्या संख्येने महायुतीचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. अभय आगरकर म्हणाले, ही निवडणूक देशाच्या भवितव्याची असल्याने जनतेने गांभीर्याने या निवडणुकी कडे पाहावे. जनतेचे कामे करून मतदारसंघाचा विकास करणाऱ्या कर्तृत्वसंपन्न डॉ.सुजय विखे यांनाच विजयी करण्याचे आवाहन करत आहे. खासदारकीच्या माध्यमातून त्यांनी अनेक मोठमोठी विकासकामे मार्गी लावली आहेत.बाबूशेठ टायरवाले म्हणाले, आज विरोधी उमेदवार लंके बरोबर असलेले सर्व जुने व नवे शिवसैनिक माझ्याबरोबर आहेत. या निवडणुकीत बाळासाहेबांचा अपमान करणाऱ्या उद्धव ठाकरेला जागा दाखवण्याची वेळ आली आहे. त्यामुळे देशाच्या विकासासाठी जनतेने पुन्हा एकदा महायुतीवर विश्वास व्यक्त करत भाजपचे उमेदवार विखेंना विजयी करावे.ज्ञानेश्वर काळे यांनी प्रास्ताविक केले. बाबासाहेब वाकळे, अनिल गट्टानी, महावीर कांकरिया, संध्या पावसे, तुषार पोटे, अनिल सबलोक, सुनुल भिंगारे आदींनी मनोगत व्यक्त केले.

वासरांची वाहतूक करणारा टेम्पो पकडला

नगरच्या दिशेने येत असलेला दिसला. टेम्पो थांबविला असता त्याने त्याचे नाव मोसीम मुस्ताक कुरेशी (वय ४०, रा. बेपारी मोहल्ला, झेंडीगेट) असे असल्याचे सांगितले. टेम्पोची पाहणी केली असता, टेम्पोमध्ये ४७ गोवंशीय वासरे दिसुन आली. त्यामध्ये म्हसीचे एक रेडकु होते. याबाबत चौकशी केली असता त्याने सदरची गोवंशीय वासरे ही समीर शेख (रा. कसाई मोहल्ला, सुपा) यांच्या मालकीचे असून ते झेंडीगेट येथे कत्तलीकरीता घेऊन जात असल्याचे सांगितले. या कारवाईत ३९ गोवंशीय जातीची वासरे आणि टेम्पो असा एकूण १० लाख ३९ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या ३९ गोवंशीय वासरांची पोलिसांनी सुटका केली.

जिल्ह्यातील माजी विद्यार्थ्यांचा रविवारी स्नेह मेळावा

समाचार/नगर-दि.२५

शहरात उच्च शिक्षणासाठी येणा-या ग्रामीण भागातील गरजू व होतकरू मुलींसाठी अल्प खर्चात नव्याने वसतिगृहाची सुविधा उपलब्ध होत आहे. पुण्यातील विद्यार्थी साहाय्यक समिती हे वसतिगृह उभारत आहे. परिमल व प्रमोद चौधरी फाउंडेशनने यासाठी देणगी दिली आहे. येत्या जून - जुलै मध्ये ६० मुलींची निवास व भोजन व्यवस्था येथे होणार असून सर्व अद्ययावत सुविधा उपलब्ध असणार आहेत. याउपक्रमांची माहिती व्हावी, स्थानिक कार्यकर्ते या कार्याशी जोडले जावेत म्हणून या संस्थेच्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेह मेळाव्याचे आयोजन केले आहे.

स्नेह मेळावा रविवार, दि. २८ रोजी सकाळी ११ ते २ या मध्ये (बालिकाश्रम रोड, महालक्ष्मी उद्यानाच्या मागे, ताठे मळा) कै. मधुभाऊ चौधरी मुलींचे वसतिगृह येथे होणार आहे. या मेळाव्यास समितीचे कार्यकारी विश्वस्त, कार्यकारी मंडळातील पदाधिकारी, कार्यकर्ते, शहरातील विविध महाविद्यालयाचे प्राचार्य, सामाजिक आणि विविध क्षेत्रा जिल्ह्यातील माजी विद्यार्थ्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन माजी विद्यार्थी मंडळाचे अध्यक्ष गणेश काळे यांनी केले आहे.

निधन वार्ता

जयप्रकाश बाजीया

समाचार/नगर-दि.२५

येथील एस.टी. महामंडळातील निवृत्त कर्मचारी व कॉम्प्रो सिस्टीम ॲण्ड सर्व्हीसेसचे संचालक जयप्रकाश बाजीया यांचे बुधवार दि.२४ एप्रिल रोजी निधन झाले. ते ७२ वर्षांचे होते. त्यांच्यावर नालेगांव अमरधाम स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. कर्तव्यदक्ष व प्रामाणिक कर्मचारी म्हणून ते परिचित होते. मनमिळावू स्वभावामुळे त्यांचा मोठा मित्र परिवार होता. धार्मिक व सामाजिक कार्यात ते सक्रिय सहभागी असत.

शिवाजी मोहिते

समाचार/नगर-दि.२५

येथील वाघस्कर गल्लीत राहणारे सेवानिवृत्त लष्करी सैनिक शिवाजी गंगाधर मोहिते (वय ७२) यांचे अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर शुक्लेश्वर मंदिराजवळील अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. मोहिते यांनी जम्मू-काश्मिर, ग्वाल्हेर आदी ठिकाणी लष्करात सेवा केली. त्यांच्या पश्चात भाऊ, बहिणी, पत्नी, २ मुले, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. रयत शिक्षण संस्थेतील सेवानिवृत्त प्राचार्य कैलासराव मोहिते यांचे ते धाकटे बंधू होत.

सुरेश निस्ताने

समाचार/नगर-दि.२५

खिस्तगल्ली येथील कैलास डेअरीचे संचालक सुरेश भाऊसाहेब निस्ताने यांचे बुधवारी रात्री अल्पशा आजाराने निधन झाले. ते ६४ वर्षांचे होते. त्यांच्यावर लालटाकी येथील स्मशानभुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सूना, जावई, नातवंडे असा परिवार आहे. कैलास नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रखमाजी निस्ताने यांचे ते लहान बंधू होत.

खा. सुजय विखे यांचा शरद पवारांवर निशाणा

मुंडे परिवाराला त्रास देणारांना जागा दाखवा

समाचार/नगर-दि.२५

मागील ४० वर्षात मुंडे परिवाराला त्रास देण्याचे काम केले. त्यांना यावेळी त्यांची जागा दाखवा, अशा शब्दात खा. सुजय विखे यांनी शरद पवार यांच्यावर नाव न घेता निशाणा साधला. खा. विखे यांनी आज नगर शहरातील कांदा मार्केटमध्ये व्यापारी, हमाल आणि मापाडी यांच्याशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. ज्यांनी सातत्याने मुंडे परिवाराला राजकारणातून हद्दपार करण्याचा प्रयत्न केला. त्यांना राजकारणातून संपवण्यासाठी वेळोवेळी कटकारस्थाने रचली, अशांना मुंडे यांच्या समर्थकांनी चांगला धडा शिकवला पाहिजे, असेही ते म्हणाले.

यावेळी आमदार संग्राम जगताप, सचिन कोतकर, माजी सभापती अविनाश घुले, माजी नगरसेवक निखील वारे उपस्थित होते. खा. विखे पुढे म्हणाले की, नगरमधील व्यापाऱ्यांसाठी विविध सेवासुविधा निर्माण करण्यात येतील. खा. विखे म्हणाले की, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी हे नेहमीच गरिबांच्या सोबतीला आहेत. हमाल आणि मापाडी, माथाडी कामगार यांच्या विकासासाठी त्यांनी केलेल्या कामांची माहिती देऊन ते म्हणाले की, व्यापारी वर्गासाठी मोदी सराकारने मागील १० वर्षात विविध योजना प्रभावीपणे राबविल्या आहेत. त्यामुळे पुन्हा व्यापाऱ्यांच्या हितासाठी नरेंद्र मोदी यांना पंतप्रधान करणे गरजेचे आहे. आपले एक मत हे मोदींच्या पंतप्रधान पदाचा मार्ग बळकट करण्यासाठी आहे.

खा. विखे पुढे म्हणाले की, महायुती सरकार हे व्यापाऱ्यांच्या जोडीला आहे. व्यापार वाढविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक मुलभूत सेवा सुविधांवर सरकारच्यावतीने भर दिला जाईल. तसेच केंद्र आणि राज्य सरकारच्या योजनांचा पुरेपुर लाभ व्यापाऱ्यांना मिळण्यासाठी त्यांच्याकडून विशेष प्रयत्न केले जातील, असे त्यांनी सांगितले. नारायणडोह येथील नवीन रेल्वे स्थानकात कांदा व्यापाऱ्यांसाठी रल्वे धक्का निर्माण केला जाणार आहे.त्यामुळे नगर तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीमधील कांदा व्यापाऱ्यांना भारतभर कांद्याचा व्यापार करता येईल. विळद येथील नवीन एमआयडीसीमध्ये केंद्र सरकारच्या माध्यमातून कांद्यावर प्रकिया करण्यासाठी प्रोसेसिंग युनिट उभारणी केली जाईल, असेही खा. विखे यांनी सांगितले.

आ. प्राजक्त तनुपरे यांनी भरला उमेदवारी अर्ज

समाचार/नगर-दि.२५

राष्ट्रवादी काँग्रेसच्या शरद पवार गटाने बुधवारी नगर लोकसभा मतदारसंघातून माजी राज्यमंत्री आमदार प्राजक्त तनुपरे यांचा पर्यायी उमेदवार म्हणून अर्ज दाखल केला आहे. दिवसभरात ७ उमेदवारांनी ११ नामनिर्देशन पत्र दाखल केले.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाने महाविकास आघाडीचे उमेदवार म्हणून नीलेश लंके यांची उमेदवारी जाहीर केली आहे. त्यांनी मंगळवारी उमदेवारी अर्ज दाखल केला. मात्र पर्यायी उमेदवार म्हणून आमदार तनुपरे यांचा अर्ज दाखल करण्यात आला. उमेदवारी अर्ज दाखल करण्यासाठी आमदार तनपुरे स्वत: उपस्थित नव्हते. त्यांनी प्रतिनिधीमार्फत अर्ज दाखल केला. त्यांनी एकूण तीन अर्ज दाखल केले आहेत. विरोधी नीलेश लंके यांच्या उमेदवारी अर्जास हरकत घेतली गेल्यास पर्यायी उमेदवार म्हणून तनपुरे यांचे नाव पुढे करण्यात आल्याचे समजले.

दिवसभरात मदन कानिफनाथ सोनवणे (राईट टू रेकॉल पक्ष), रवींद्र लीलाचंद कोठारी (अपक्ष), अमोल विलास पाचुंदकर (अपक्ष), प्राजक्त प्रसादराव तनपुरे (राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, शरद पवार), महेंद्र दादासाहेब शिंदे (वंचित बहुजन आघडी व अपक्ष), मच्छिंद्र राधाकिसन गावडे (अपक्ष) व छगन भिकाजी पानसे (अपक्ष) अशा सात उमेदवारांनी एकूण ११ नामनिर्दशन पत्र दाखल केले. आतापर्यंत एकूण ८० उमेदवारांनी १५६ नामनिर्देशन पत्र नेले आहेत.

समाचार

वाचकांना नम्र सूचना

समाचार वृत्तपत्रातून प्रसिध्द होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची **समाचार** वृत्तपत्र कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्यांच्या परिणामाबद्दल **समाचार** वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत. याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

मुंबई शेअर भाव

कोटक बँकेवर आरबीआयची टाच

शेअर्सचा भाग २४० ने कोसळला

(शेअर सबब्रोकर)

अशोक पटवा

फोन-२४५२५२७, २४५२२६४

मोबा. ८७८८६९९९६१

दिनांक २५-४-२०२४

दुपारी २ पर्यंतचे भाव

आजचा इंडेक्स :	७४०१२
एसीसी	२५४१-४२
एशियन पेंट	२८५३-५४
बजाज ऑटो लि.	८६८३-८४
बलराम फूड चिनी	३८८-८९
भारत फोर्ज	१३१५-१६
क्रॉम्प्टन	३०८-०९
डीएलएफ	८८५-८६
डॉ. रेड्डीज् लॅब	६०५९-६०
ग्रॅफाईट इंडिया	६९४-९५
हिंदुस्थान युनिलिव्हर	२२३१-३२
आयटीसी लि.	४३५-३६
एल ॲण्ड टी लि.	३६३१-३२
रिलायन्स इंड.	२९१२-१३
एसबीआय	८०१-०२
टाटा मोटर्स	९९४-९५
टाटा स्टील	१६५-६६
टीसीएस	३८४२-४३
लक्ष्मी ऑरगॅनिक	२५०-५१
सुवेन फार्मा	६४५-४६

PDF Compressor Free Version

ज्ञानविज्ञान पुरस्काराचे मानकरी-२०२४

थोर साहित्यिक, संत साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा.डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे

डॉ. प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे यांच्यासंबंधी लिहिणे ही त्यांची गरज नाही. ती वाचकांची त्यांना जवळून-दुरून ओळखणाऱ्या, न ओळखणाऱ्या चाहत्यांची भूक आहे. त्यांना जाणण्याची आवश्यकता त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या वाचकांना असते. 'गुप्त तेची प्रकटावे। असाध्य तेची साधावे।' प्रा.डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांचा परिचय करून देणे म्हणजे काजव्याने सूर्याची ओळख करून द्यावी तसे हे होणार आहे.

गीतेचे स्मरण होताच, राम नाम मनात येताच तनू पुलकीत होऊन ज्यांच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहू लागतात, अशी आमच्या नगरची ज्ञान-कर्म-भक्तीची मूर्ती म्हणजेच डॉ. प्रा.अनिल सहस्त्रबुद्धे होय. वक्ता दशसहस्त्रेषु असे म्हणतात. त्यांचे नावही मोठे छान आहे. अनिल म्हणजे वारा. वारा जसा सर्वांना सुख देतो, प्राण देतो, आनंद देतो, तसे हे प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे सर्वांनाच श्रीमद् भगवद्गीतेचे रसपान करतात. ज्ञानेश्वरीसारख्या महान ग्रंथाचा अभ्यास करून स्वत: जनतेच्या मनावर अध्यात्माचे, धार्मिकतेचे, प्रेमाचे, श्रद्धेचे सिंचन ते अजूनही करतात. ज्यांच्या प्रवचनातून ज्ञान मिळते, ज्यांच्या बोलण्यातून चिंतनाला दिशा मिळते असे हे ज्ञानी व्यक्तिमत्व आहे. 'कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेशू कदाचन' या भगवद् गीतेतील वाक्याप्रमाणे त्यांनी त्यांचे जीवन समृद्ध, समाधानी केले आहे.

त्यांनी संत साहित्य, लोकसाहित्य, लोककला, लोकवाङ्मय इ. वर प्रचंड असे लेखन केले आहे. तसेच समन्वयी शेख महंमद महाराज, हरिपाठाचे मर्मलक्षी विवेचन, संतांची अभंगवाणी, ज्ञानेश्वरीतील साहित्य विचार, लोकी अलौकिक तुकाराम, संत वचनांची मात, सप्त चिरंजीवांपैकी रामभक्त हनुमानावर मोठी कादंबरी लिहिली आहे. तसेच स्वरुपाशी संवाद, संताचिया संगे, समर्थ स्वामी त्र्यंबकराज देवस्थान ट्रस्ट, देवळाली प्रवरा, अकोला येथील अगस्ती ऋषी आश्रमावर 'श्री अगस्त्य महात्म्य' ही ओवी रूपात पोथीच लिहिली आहे. यात श्री अगस्त्य ऋषींविषयी विविध कथा येतात. त्यांचे 'जातक यज्ञ' हे नाटक नगरमध्ये खूपच गाजले. शिवाय एकांकिका, कवितासंग्रह, ललित साहित्य, कथासंग्रह, ऐतिहासिक अशा निरनिराळ्या प्रकारच्या साहित्यकृती त्यांच्या हातून घडल्या आहे.

डॉ. प्रा.सहस्त्रबुद्धे यांचा लेखन हा श्वास आहे. प्रवचन हा त्यांचा प्राण आहे. ज्ञानेश्वरी, श्रीमद् भगवद्गीतेचा प्रचार प्रसार करणे ही त्यांच्या जीवनभराची आस आहे. वनवासी कल्याण आश्रम (जन जाती कल्याण आश्रम), गुहक विद्यार्थी वसतिगृह अकोले येथे त्यांनी सामाजिक कार्य केले आहे.आदिवासी विद्यार्थ्यांसाठी स्वत:च्या घरात वसतिगृह सुरू केले. राष्ट्रीय स्व.संघाचा परिवार म्हणून ५० विद्यार्थ्यांचे वसतिगृह अकोले येथे सुरू केले आहे. राष्ट्रसेवा मंडळ संचालित स्फूर्ती प्रकाशन मंचच्या माध्यमातून सामूहिक ग्रंथ प्रकाशन उपक्रम चालवला. २००८ पासून आनंदोत्सव चॅरिटेबल ट्रस्टच्या माध्यमातून सातत्याने कार्य सुरू आहे. या सर्व अफाट लेखन कार्याबद्दल, समाज कार्याबद्दल त्यांना अनेक संस्थांनी पुरस्कार देऊन पुरस्कृत केले आहे.

महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार, विद्वत पुरस्कार, अकोले गौरव पुरस्कार (जन्मगाव), साहित्य कामगिरीबद्दल साहित्य सेवा पुरस्कार , आदिवासी जीवनावरील उत्कृष्ट लेखनासाठी जीवनगौरव पुरस्कार, स्वरानंद प्रबोधिनीचा महर्षी अगस्त्य लोकरत्न पुरस्कार, ग्रंथ पुरस्कार, संतसेवा गौरव पुरस्कार असे अनेक पुरस्कार त्यांना प्राप्त झाले आहेत.

प्रा. डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांच्या साहित्यावर झालेले संशोधन आणि समीक्षा ग्रंथ बरेच विद्यार्थी अभ्यासत आहेत. त्यांच्या अनेक कादंबऱ्यांवर पीएच.डी., एम.फिल करीत आहेत.

प्रा.डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांनी ४२ वर्षे हिंद सेवा मंडळात शिक्षक, प्राध्यापक, पेमराज सारडा महाविद्यालयाचे प्राचार्य म्हणून सेवा केली आहे. ते अत्यंत साधे, प्रेमळ, शिस्तप्रिय म्हणून कार्यरत होते. ते विद्यार्थीप्रिय असे शिक्षक होते.

प्रा. डॉ.अनिल सहस्त्रबुद्धे यांचे प्रवचने ऐकल्यावर वाटते..

पुसो जाणे सांगो जाणे
। अर्थांतर करो जाणे,
सकळीकांचे राखो जाणे।
समाधान।। ही ओवी अनिल सहस्त्रबुद्धे जगतात.

समर्थ रामदास स्वामी म्हणतात-

ऐसा पुरुष धारणेचा । तोची आधार बहुतांचा।
दास म्हणे रघुनाथांचा । गुण घ्यावा।।

अशा या प्रा.डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे यांना ज्येष्ठ नागरिक मंच, सावेडी यांच्यातर्फे शुक्रवार दि.२६ एप्रिल रोजी 'ज्ञान विज्ञान पुरस्कार' हा मानाचा तुरा असलेला पुरस्कार देण्यात येत आहे. भिस्तबाग रोड, गुरुकृपा कॉलनी, 'गुरूकृपा हॉल' जैनस्थानकाजवळ, सावेडी, अहमदनगर (अहिल्यानगर) येथे हा कार्यक्रम होणार आहे.

- श्रीमती पुष्पा चितांबर
सावेडी, अहमदनगर
मो.९४२२३१४४५१.

रामभक्त हनुमान भारतीय संस्कृतीचे प्रतिक- हजारे

समाचार/नगर-दि.२५

आज प्रत्येक गावात मारुतीचे मंदिरे आहेत. एकवचनी, एकबाणी, एकपत्नी रामसोबत राहून सेवा केली, त्यांच्या पदरी हे पुण्य पडले. म्हणूनच हे अंजनीच्या सूता तुला रामाचे वरदान' असे म्हंटले जाते. त्यांची भक्ती ही आपल्याला प्रेरणादायी आहे, असे भागवताचार्य हभप योगिताताई हजारे यांनी किर्तनामधून सांगितले.

नगर-छत्रपती संभाजीनगर रोडवरील गजराजनगर येथे शिवराजे मित्र मंडळ, सूर्यपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने पावन हनुमान मंदिरात जन्मोत्सव साजरा करण्यात आला. या उत्सवाची सांगता रात्री किर्तन व महाप्रसादाने झाली. याप्रसंगी बबलू सूर्यवंशी, दत्ता ताकपिरे, हभप शिवाजी पठारे, हभप दत्तात्रय शिंदे, संदिप परदेशी, राज आंबेकर, राकेश शिनगारे, दत्तात्रय बोराडे, शक्ती कांबळे, अतुल घाटे, कुणाल चव्हाण, अर्शद खान, तेजस कांडेकर, संकेत शिनगारे, किसन बोर्हाडे, साहिल कांडेकर, सनी मुसळे, अभिजित पाखरे, एकनाथ शिंदे आदिंसह ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी मृदूंगाचार्य कृष्णा महाराज सपकाळ, गायनाचार्य अभंग महाराज सोमवंशी यांनी किर्तनाला साथ-संगत दिली. महाप्रसादासाठी हेमंत पटेल यांचे योगदान लाभले.

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय, अहमदनगर आयोजित द लाईट चित्रपटाचे स्पेशल स्क्रीनिंग कॉम्प्लेक्स स्मार्ट थिएटर, कोहिनूर मॉल येथे आयोजित करण्यात आले. त्याचे उद्घाटन धनश्री विखे पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी प्रभा दीदी, डॉ. दीपक हरके, सुनीता कुंजीर, विहान हरके.

स्पंदन एक सामाजिक संस्था

कल्याण हे तसे प्रेमळ माणसांचे शहर. इथे साहित्यावर, कलेवर, संगीतावर प्रेम करणारे लोक कितीतरी सापडतील. हेच समविचारी लोक एकत्र येतात आणि त्यातूनच आकाराला येते स्पंदन सारखी एक सेवाभावी सामाजिक संस्था. सामाजिक बांधिलकीच्या उद्देशातूनच 'स्पंदन' या सामाजिक संस्थेची स्थापना केली गेली. हुशार, होतकरू, मात्र आर्थिक परिस्थितीशी मेळ साधणाऱ्या विद्यार्थ्यांची स्पंदन अधिक सक्षम करण्याकरिता कल्याणमधील ही संस्था कार्यरत आहे. या संस्थेतील सर्व सभासद अगदी मनापासून सामाजिक कार्यात स्वतः ला झोकून देऊन काम करतात हे विशेष. २००५ साली जुलैच्या पावसाने मुंबापुरीला झोडपले. कल्याण शहरालाही पाण्याने वेढले होते. मात्र या पावसात घरात बसून राहण्यापेक्षा शहरातील नुकसानग्रस्तांना मदत करण्याची अभिनव संकल्पना कल्याणमधील स्पंदनच्या सभासदानी मांडली. त्यानुसार या उत्साही कार्यकर्त्यांनी तत्काळ मदतकार्य सुरु केले. या पावसामध्ये अडकलेल्या

लोकसेवार्थ

लहान मुलांना, स्त्रिया आणि वृद्धांना सुखरूप स्थळी पोहचवून त्यांच्यासाठी अन्नछत्राची सोय याच कार्यकर्त्यांनी अगदी तातडीने केली. यातूनच स्पंदन या संस्थेच्या पुढील कार्याची दिशा सापडली. या संस्थेचे विशेष म्हणजे या संस्थेच्या अध्यक्षापासून ते अगदी कार्यकर्त्यांपर्यंत सगळेच चाकरमानी आहेत. प्रत्येकजण आपली नोकरी आणि कुटुंब सांभाळून आपल्या परीने संस्थेच्या सामाजिक कार्यासाठी आपले योगदान देत असतो. संस्थेच्या माध्यमातूनच 'आयुष्यावर बोलू काही' या सांस्कृतिक कार्यक्रमाची सुरवात केली गेली आणि या कार्यक्रमाच्या माध्यमातून जमलेला निधी हा गरीब, होतकरू विद्यार्थ्यांच्या आर्थिक मदतीसाठी वापरला गेला. सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक मदतीसाठी मदतीचा हा यज्ञ अविरत सुरूच आहे . आतापर्यंत 'गुलजार बात पशमीने की', मूर्तिमंत अस्मिता, 'सिनेमा नावाचा माणूस', देव गाणी, 'साज', एस डी आर डी, 'अजय अतुल नाईट .रॅट के हमसफर यासारखे अनेक कार्यक्रम संस्थांच्या माध्यमातून आयोजित केले गेले आहेत . या कार्यक्रमाच्या निधीतून शालेय विद्यार्थ्यांना मदत केली गेली आहे . आतापर्यंत सुमारे ३०० हून अधिक विद्यार्थ्यांना संस्थेने मदत केली आहे. सुरवातीला केवळ काम करणारी स्पंदन ही संस्था आता नोंदणीकृत सामाजिक संस्था आहे. महेश करंबेळकर, अरुण काळे, प्रसाद वाघमारे, सुधीर सोमण, मंदार परांजपे यां 'स्पंदन'च्या कार्यकर्त्यांचा आवर्जून उल्लेख करायलाच हवा. आज स्पंदनद्वारे मदत केलेले विद्यार्थी मोठे होत आहेत. याचे समाधान या संस्थेच्या कार्यकर्त्यांना मिळाले आहे. ज्या विद्यार्थ्यांना आर्थिक मदत मिळाली अशा विद्यार्थ्यांनी देखील जाण ठेऊन आपल्या पगारातून संस्थेला आर्थिक मदतीचा हातभार लावलेला आहे. एकूणच स्पंदन सारखी संस्था म्हणजे सामाजिक बांधिलकी जपणार एक चालत बोलत उदाहरण आहे जे समाजापुढे नक्कीच चांगला आदर्श निर्माण करणार आहे.

वाढत्या उष्णता मानावर ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूलचे उपाय

दखल

संपूर्ण महाराष्ट्रात तापमान फारच वाढत असल्याने, ऑर्किड्स द इंटरनॅशनल स्कूल विद्यार्थ्यांचे स्वास्थ्य आणि सोय ध्यानात घेत सक्रिय पावले उचलत आहे. शाळेने अनेक उपायांची अंमलबजावणी केली आहे, ज्यात सजलित राहण्यावर भर देण्यासाठी बाहेरील क्रियाकल्पांच्या वेळांमध्ये बदल करत चिकित्सालयांच्या उपलब्धतेची खात्री केली आहे.

विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षितता आमच्यासाठी नेहमीच शीर्ष प्राधान्य आहे, असे स्पष्ट करत चिंचवड कॅम्पसच्या मुख्याध्यापिका माधवी चिरावूरी म्हणाल्या, वाढत्या तापमानाबरोबरच आमचे विद्यार्थी आरामशीर आणि सजलित राहावेत यासाठी आम्ही आवश्यक बदल केले आहेत.

शब्दखेळ - १५७

खाली दिलेल्या चौकोनात मुंबईतील १० जंक्शन रेल्वे स्थानकांची नाव लपलेली आहेत. शोधा पाहू.

सी	वा	ता	क	भा	य	ख	ळा
एस	शी	श्री	क	म	मुं	मी	पे
टी	ल	स्सी	डु	ल	ब	मा	अं
स	च	को	णी	प	ई	वा	धे
वां	र्च	दा	री	नी	सें	मा	री
द्रे	गे	द	इ	र	ट्र	न	वि
र	ट	र	ची	से	ल	णी	ष्णू
घा	ट	को	प	र	लि	कु	र्ला

शब्दखेळ - १५६ चे उत्तर

ज्ञा	क	तु	का	रा	म	वा	ए
स	ने	स्वा	त	त्र्य	वी	गो	क
र	व	श्व	क	का	म	रा	ना
मु	दे	ना	र	दे	व	कुं	थ
क्ता	म	ड	सो	पा	न	भा	ळा
बा	ना	जा	ब	सि	ह	र	मे
ई	सा	व	ता	मा	ळी	द	खा
ज	ना	बा	ई	हा	मा	न	चो

आयईटीद्वारा आयईटी इंडिया स्कॉलरशिप ॲवॉर्डच्या ८ व्या आवृत्तीची घोषणा

इंन्स्टिटयुशन ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीने (आयईटी) एकत्रित पुरस्कार मुल्य १० लाख रुपये असलेल्या त्याच्या प्रतिष्ठित अशा आयईटी इंडिया स्कॉलरशिप ॲवॉर्डच्या आठव्या आवृत्तीसाठी अर्ज मागवले आहेत. सर्व एआयसीटीई/यूजीसी-मान्यताप्राप्त इंन्स्टिट्युटच्या विद्यार्थ्यांसाठी खुले असलेल्या आयईटी इंडिया स्कॉलरशिप ॲवॉर्ड प्रोग्रामचे ध्येय भारतातील पदवीपूर्व अभियांत्रिकी विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक उत्कृष्टतेस आणि कल्पकतेस पुरस्कृत करणे आणि साजरे करणे आहे.

या पूर्वीचे विजेते गुगल, ॲपल बोईंग, डेलॉईट आणि एमआयटीसारख्या अग्रणी उद्योगांमध्ये सामील झाले असून, काहीजण स्वतः उद्योजक बनले आहेत. हा ॲवॉर्ड शैक्षणिक कामगिरी, अभ्यासेतर उपक्रम, कक्षेच्या बाहेरील उपक्रम आणि सामाजिक आव्हाने सोडविण्यासाठी कल्पक अभियांत्रिकी उपाय सुचविणे सामील असलेल्या सहभाग्यांच्या सर्व मापदंडांचे मुल्यांकन करतो. पहिल्या फेरीत, त्यांच्या शैक्षणिक कामगिरी आणि अभ्यासेतर उपक्रमांच्या आधारावर विद्यार्थ्यांची शॉर्टलिस्ट केली जाते. नंतर त्यांना एसटीईएम विषय आणि तांत्रिक कुशलतेवर एक ऑनलाईन चाचणी द्यावी लागते. कट-ऑफ गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रादेशिक फेऱ्यांमध्ये समर्पक सामाजिक आव्हानावरील त्यांचे तंत्रज्ञानविषयक उपाय प्रस्तुत करण्यास बोलावले जाते. प्रादेशिक विजेत्यांना अखेरीस शीर्षक जिंकण्यासाठी राष्ट्रीय अंतिम फेऱ्यांमध्ये लढावे लागते. आयईटी इंडिया स्कॉलरशिप ॲवॉर्डच्या मागील सात आवृत्त्यांमध्ये संपूर्ण भारतातून प्रचंड सहभागासह ४३,००० पेक्षा जास्त आवेदने प्राप्त झाली होती. २०१३ मध्ये स्थापित आयईटी इंडिया स्कॉलरशिप ॲवॉर्ड भारतीय अभियांत्रिकी समुदायासह आयईटीची वचनबद्धता दर्शविते. कार्यबलात प्रवेश करणाऱ्या इंजिनिअर्सच्या पुढील पिढीतील नाविन्यपूर्ण विचारसरणीस पुरस्कृत करणे या कार्यक्रमाचे ध्येय आहे आणि हा भारतातील अभियांत्रिकीच्या गुणवत्तेत सुधारणा करण्यावर

अक्षरधारा

लक्ष केंद्रित करणाऱ्या आयईटीच्या व्यापक उपक्रमांमधील एक भाग आहे. २०२४ आवृत्तीसाठी आता आवेदने खुली आहेत. अधिक माहितीसाठी, कृपया भेट द्या - https://bit.ly/3TSwZYf

लोकजागर

संकलन-संयोजन
सुबोध रणशेवरे
subodh.ranshevre rediffmail.com

PDF Compressor Free Version

सारडा विद्यालयातील शिक्षकांचा उपक्रम

विक्रेते, ग्रंथपालांचा सत्कार करुन पुस्तक दिन साजरा

समाचार/नगर-दि.२५

जागतिक पुस्तकदिनी सीताराम सारडा विद्यालयाच्यावतीने शहरात वाचन संस्कृती रुजवणार्या पुस्तक दुकानदार, सार्वजनिक ग्रंथालयांचे ग्रंथपाल यांचा सत्कार करून व पुस्तक भिशीत शिक्षकांनी पुस्तक भिशित पुस्तके खरेदी करून पुस्तक दिन साजरा केला.

यावेळी उदय बुक स्टॉलचे विवेक कुलकर्णी, अभिरुची वाचनालय चळवळ चालवलेले शिरीष बापट, ललित बुक स्टॉलचे मनोहर लांडगे, जिल्हा वाचनालयाचे अध्यक्ष शिरीष मोडक, ग्रंथपाल अमोल इथापे, नितीन भारताल यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, शाळेचे अध्यक्ष मकरंद खेर उपस्थित होते.

समाज म्हणून आपण या ग्रंथ प्रसार करणार्या व्यक्ती व संस्थाविषयी कृतज्ञ असायला हवे यासाठी हा सन्मान करत आहोत असे मुख्याध्यापक हेरंब कुलकर्णी यांनी सांगितले. शाळेत सुरू असलेल्या पुस्तक भिशी उपक्रमात भिशी लागलेल्या ६ शिक्षकांना प्रत्येकी ३६०० रुपयांची पुस्तके वितरीत करण्यात आली. वर्षभर शाळेत सुरू असलेल्या पुस्तक वाचन उपक्रमाने आम्ही शिक्षक म्हणून समृध्द झालो अशी भावना शिक्षक रविंद्र चोभे व शीतल शिंदे यांनी व्यक्त केली.

अध्यक्ष शिरीष मोडक यांनी पुस्तक दिनाच्या निमित्ताने केलेला सत्कार अभिनव असून पुस्तके समाजात पोहोचवणे हे महत्वाचे योगदान असल्याचे सांगून विल्यम शेक्सपियर ची माहिती सांगितली. ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व शाळेचे अध्यक्ष मकरंद खेर यांनी पुस्तक भिशी उपक्रमाचे कौतुक करून वाचन महत्वाचे असल्याचे सांगितले. शिरीष बापट व अमोल इथापे यांनी सत्कार केल्याबद्दल आभार व्यक्त करून पुस्तके पोहोचवण्याचे केलेले प्रयत्न सविस्तर सांगितले.

कदम- शिंदे परिवाराचा आदर्श; वरातीला फाटा

टाळ-मृदुंगाच्या गजरात वधू-वरांची मिरवणूक

समाचार/नगर-दि.२५

लग्न सोहळ्यातील वराच्या मिरवणुकीत डी – जे ला फाटा देऊन वारकरी संप्रदायाच्या टाळ मृदुंगात काढलेली मिरवणूक समाजासाठी प्रेरणादायी आहे. वराच्या मिरवणूकीतील डिजे सिस्टिम हद्दपार करण्याची गरज आहे. असे प्रतिपादन सरपंच प्रतिभा शिंदे यांनी केले.

तालुक्यातील पिंपळगाव कौडा येथील ह. भ. प. सोपान कदम व संतोष शिंदे परिवाराने लग्न समारंभातील वराच्या मिरवणुकित वारकरी यांचे टाळ मृदुगांच्या गजरात वधू वरांची मिर वणू की बरोबरच सांय काळी वरातन ठेवता कीर्तन ठेवून आगळावेगळा आदर्श ठेवला आहे. निकेतन व तनुजा यांच्या विवाह सोहळ्यानिमित्त डीजेला फाटा देऊन पारंपरिक व वारकरी सांप्रदायिक पद्धतीने टाळा मृदुंगाच्या निनादात वधू – वराची मिरवणूक काढली. विवाह सोहळ्यानिमित्त आलेल्या वर्हाडी मंडळी समोर भक्तिमय वातावरणात विवाह सोहळा पार पाडला.

ह. भ. प. शारदा ताईंनी (नाशिक) मनोगत व्यक्त करताना आजच्या युगात आधुनिक पद्धतीने विवाह न होता, अशाच पद्धतीने विवाह सोहळे पार पाडले पाहिजेत. डी – जे सिस्टीम मुळे ध्वनी प्रदूषणाबरोबरच नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत आहे . तसेच अनेकदा तरुण मद्य– धुंद होऊन विवाह सोहळ्याचा आनंद हिरावून घेतला जात आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील वधू–वर पक्षांनी कदम – शिंदे परिवाराचा वारकरी संप्रदायाच्या भक्तिमय वातावरणात विवाह सोहळा प्रेरणादायी आहे.

२७ पासून आयोजन; राज्यभरातून प्रतिसाद

विधी महाविद्यालयात अभिरुप न्यायालय स्पर्धा

समाचार/नगर-दि.२५

येथील न्यू लॉ कॉलेजमध्ये न्यायमूर्ती कै. एस. बी. म्हसे पा. ६व्या राज्यस्तरीय अभिरुप न्यायालय स्पर्धेचे आयोजन शनिवार (दि. २७) व रविवार (दि. २८ एप्रिल) रोजी करण्यात आले आहे. स्पर्धेचे उद्घाटन मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती राजेंद्र अवचट, यांच्या हस्ते सकाळी ९ वाजता होईल. अध्यक्षस्थान अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे भूषविणार आहेत, तर बक्षिस वितरण समारंभ रविवार (दि. २८) मुंबई उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती शैलेश पी. ब्रम्हे यांच्या हस्ते सकाळी ११.३० वा. होईल. या कार्यक्रमाचे अध्यक्षपद अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या खजिनदार ड. दीपलक्ष्मी संभाजीराव म्हसे या भूषविणार आहेत.

स्पर्धेसाठी राज्यभरातून विविध विधी महाविद्यालयांतून स्पर्धेसाठी स्पर्धकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याची माहिती प्राचार्य डॉ. एम. एम. तांबे यांनी दिली. अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सचिव ॲड. व्ही. डी. आठरे पा., खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे पा., ॲड. माणिकराव मोरे, ॲड.. माधवेश्वरी म्हसे पा., ॲड. सुभाष भोर आदींची स्पर्धा संयोजन समिती असून, त्यांना महाविद्यालयाचे स्पर्धा समन्वयक प्रा. विजयकुमार शिंदे, डॉ. अतुल मोरे, डॉ. बाळासाहेब पांढरे, कार्यालयीन अधीक्षक परशुराम म्हस्के यांचे सहकार्य लाभत आहे.

केंद्र व राज्य सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी- पालकमंत्री विखे

समाचार/नगर-दि.२५

अडचणीत सापडलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना पाच रुपये अनुदान देण्याचा महत्वपूर्ण निर्णय राज्य सरकारने घेतला होता. केंद्र आणि राज्य सरकार हे शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणारे आहे, असे प्रतिपादन पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी केले.

ते म्हणाले की, जिल्ह्यातील तरुणांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देण्यासाठी अनेक उद्योजक आता जिल्ह्यात येण्यास इच्छुक आहेत. नामवंत कंपन्या येणार असल्यामुळे तरुणांनाही संधी मिळणार आहे. यापुर्वी धाक आणि दडपशाहीमुळे चांगले उद्योग जिल्ह्यातून निघून गेले. ही परिस्थिती आपल्याला बदलायची असेल तर, उद्योजकांच्या पाठीशी उभा राहणारा खासदार निवडून द्यावा लागेल. देशात पुन्हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वामध्ये सरकार येणार असल्यामुळे जिल्ह्याच्या विकासाला चांगले पाठबळ मिळेल, असे सांगून विखे पुढे म्हणाले की, राज्य सरकारने शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची भूमिका घेतली आहे. एक रुपयात पीक विमा योजनाचा लाभ शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात मिळाला आहे.

अडचणीत सापडलेल्या दूध उत्पादक शेतकऱ्यांना मदत म्हणून राज्य सरकारने पाच रुपये अनुदानाची योजना सुरु केली. आज जिल्ह्यातील बहुसंख्य शेतकऱ्यांच्या खात्यात अनुदान वर्ग झाले असून, सर्व शेतकऱ्यांना या अनुदान योजनेचा लाभ मिळेल.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्य माणसांच्या हिताचे निर्णय होत आहेत. देश आज विविध क्षेत्रात प्रगती करीत असून, देश महाशक्ती बनण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे.

सेवाप्रीत सोशल फाऊंडेशनची मदत

बालघर प्रकल्पातील मुलांच्या स्वच्छतागृहाचे लोकार्पण

समाचार/नगर-दि.२५

गरजू विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या वतीने बालघर प्रकल्पातील वंचित, अनाथ व निराधार मुलांसाठी स्वच्छतागृह उपलब्ध करुन देण्यात आले. तर मुलांना खेळण्यासाठी झोक्यांची व्यवस्था करुन देण्यात आली. उन्हाळी सुट्टीत मुलांना खेळता यावे या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.

सेवाप्रीतच्या संस्थापक अध्यक्षा जागृती ओबेरॉय, प्रकल्प प्रमुख गीतांजली माळवदे, ग्रुप लिडर अर्चना खंडेलवाल, रितू वधवा, तृप्ती कोठारी, स्मिता देशमुख, मनिषा कंक, पूजा गोंडाळ, वंदना गोसावी, दिपाली देऊतकर, वैशाली उत्तेकर, अंजली गायकवाड, स्मिता मालवे, उर्मिला सायंबर, सुनिता लेकुरवाळे, दीपा रोहिडा, माधुरी येळाई, भारती यादव, सोनी पाठक, आरती कुलकर्णी, डॉ. राजश्री मगर, संगीता भागवत, नूतन भोसले, रोहिणी पाटील, सोनिया कुंद्रा, डॉ. निशा पाटील, रेणुका दौड, आरती थोरात आदींसह महिला सदस्या उपस्थित होत्या. जागृती ओबेरॉय, गीतांजली माळवदे यांची भाषणे झाली.

बालघर प्रकल्पातील मुला–मुलींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृह व बाथरुमची व्यवस्था करुन देण्यात आली. याचा लोकार्पण उपस्थित सेवाप्रीतच्या महिलांच्या हस्ते पार पडला.

बालघर प्रकल्पाचे संस्थापक युवराज गुंड यांनी सामाजिक संवेदना जागरुक ठेऊन सेवाप्रीत सोशल फाउंडेशनच्या महिलांनी केलेल्या सामाजिक कार्याचे कौतुक केले. तर वंचित मुलांच्या शिक्षणाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने त्यांचे नेहमीच सहकार्य मिळत असल्याबद्दल आभार मानले.

काळ भैरवनाथांचा रविवारी आगडगावमध्ये यात्रोत्सव

समाचार/नगर-दि.२५

आगडगाव (ता.नगर) येथील काळ भैरवनाथांची यात्रा रविवारी (दि. २८) भरणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या उत्सवात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याचे देवस्थानच्या वतीने सांगण्यात आले.

सालाबादप्रमाणे यात्रोत्सवात कार्यक्रम होतील. रविवारी पहाटे महाआरती, सकाळी कावडीने आणलेल्या पाण्याने जलाभिषेक, दुपारी महाप्रसाद वाटप, संध्याकाळी काठ्यांची मिरवणूक व सांस्कृतिक कार्यक्रम होईल. कावडीनंतर होणाऱ्या महाआरतीला उद्योजक नरेंद्र फिरोदिया, तसेच मान्यवर उपस्थित राहतील. दुसऱ्या दिवशी (सोमवारी) कुस्त्यांचा हगामा भरणार आहे. राज्यातील मल्ल त्यामध्ये सहभागी होतील. हा हगामा जिल्ह्यात चर्चिला जातो. यात्रेकरु, भाविकांसाठी देवस्थानच्या वतीने व्यवस्था करण्यात आली आहे. भाविकांनी या कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन आगडगाव, टोकेवाडी ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे. यात्रेच्या दिवशी सकाळी कावडी मिरवणूक असते. ही विशेष प्रक्षणीय असते. यात्रेनिमित्त गावातील मुली गाहेरी येतात. त्यानिमित्त माळीवाडा बसस्थानकापासून विशेष बसची व्यवस्था करण्यात आली आहे. देवस्थानाजवळ विकास कामे सुरु आहेत. त्यामुळे वाहने पार्किंगची व्यवस्था स्वतंत्रपणे करण्यात आली आहे.

कार्यशाळेत प्राध्यापकांना आधुनिक उपकरणावर प्रशिक्षण

समाचार/नगर-दि.२५

शहरातील आनंदधाम समोरील आबासाहेब काकडे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट, राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या एन एन सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी, आबासाहेब काकडे कॉलेज ऑफ बी फार्मसी, बोधेगाव,राष्ट्रीय शिक्षण मंडळाच्या एन.एन. सथ्था कॉलेज ऑफ फार्मसी अहमदनगर येथे लॅब इंडिया एनालिटिकल इन्स्ट्रुमेंट्स प्रायव्हेट लिमिटेड मुंबई यांच्या सौजन्याने एक दिवशीय प्राध्यापक विकास व प्रशिक्षण कार्यक्रम (ऋउम्र) राबविण्यात आला.

२४ एप्रिल २०२४ रोजी भरवण्यात आलेल्या प्राध्यापक विकास व प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये आधुनिक उपकरण जसे एफ. टी. आय. आर आणि मायक्रोवेव्ह सिंथेसायझर यांचे प्रशिक्षण प्राध्यापकांना देण्यात आले. कार्यक्रमासाठी आबासाहेब काकडे कॉलेज ऑफ बी फार्मसी चे प्राचार्य डॉ. हेमंत गांगुर्डे, महाविद्यालयाचे विभाग प्रमुख डॉ. विकास गवळी, लॅब इंडिया चे अमित मोदगी ,नितीन कुलकर्णी, डॉ.शुभेंधू पंडित,संजय राख,धनंजय कवडे यांची उपस्थिती होती. या प्रशिक्षणासाठी एकूण ३५ प्राध्यापकांनी उपस्थिती नोंदवली व प्रशिक्षणाचा लाभ घेतला. प्राचार्य डॉ.विशाल पांडे यांनी संशोधन आणि विकास यामध्ये अत्याधुनिक साधनांचे महत्त्व यावर प्राध्यापकांना मार्गदर्शन केले. तसेच अमित मोदगी नितीन कुलकर्णी, डॉ. सुभेंद्र पंडित, संजय राख, धनंजय कवाडे यांनी मार्गदर्शन केले.

वर्ल्ड फुनाकोशी शोतोकान कराटे संस्थेतर्फे विविध बेल्ट प्रदान

समाचार/नगर-दि.२५

कराटे स्व:संरक्षणाबरोबर आत्मनिर्भर बनण्यासाठी फार उपयोगी आहे. आज विविध बेल्ट परिक्षेत उत्तीर्ण झालेल्या खेळाडूंनी कठोर मेहनत करुन हे यश संपादन केले आहे. खेळाडू पुढील स्पर्धांसाठी तयार झाले आहेत. पालकांनी मुलांच्या सुदृढ भविष्यासाठी, त्यांच्यातील आत्मविश्वास वाढीसाठी कराटे खेळास प्राधान्य द्यावे, असे आवाहन मुख्य प्रशिक्षक हारुण शेख यांनी केले.

वर्ल्ड फुनाकोशि शोतोकान कराटे संस्थेच्यावतीने विविध बेल्ट परिक्षा घेण्यात आल्या. याप्रसंगी मुख्य प्रशिक्षक हारुण शेख, प्रशिक्षक रमजान शेख, तन्वीर खान, बिलाल शेख आदिंसह यशस्वी विद्यार्थी उपस्थित होते.

विविध बेल्ट परिक्षेत उत्तीर्ण झालेले खेळाडू : यलो बेल्ट – कैवल्या नरवडे, शिवतेज वाघ, संचित कुलट, सुजित कुलट, राधेय कांकरिया. ऑरेंज बेल्ट – सोहम फिरोदिया, रिया पालिवाल, दिया गुगळे, शौर्या चिंता, स्पर्श कांकरिया, रिद्धी कांकरिया. ग्रीन बेल्ट – विराज मुनोत, स्वरा कराळे, श्रीहरि इवळे, त्रिशा गुगळे, कस्तुरी नरवडे, सिद्धांत राऊत, रजत काबरा, ईशान राऊत, अनुष्का कोहक, त्रिशा गुगळे, संस्कृती राऊत, संस्कृती नलावडे, नैतिक कंठाळी, वंश काळे. ब्ल्यू बेल्ट – आशकन शाह, पर्पल बेल्ट – सत्यम मुसमुडे, शिवम मुसमुडे.

ब्रॉऊन बेल्ट – दृष्टी पित्रोडा. गोल्डन ब्राऊन बेल्ट – सिद्धी कोरडे, श्रावणी काकडे, मिहिर जोशी. ब्लॅक बेल्ट – काव्य उदावंत, गणेश भुजबळ. फस्ट डेन – पार्थ चतारे, अहना भंडारी. यावेळी दिपाली भालेराव, सायली सुपेकर, महेक शेख, विधी गुंदेचा, ऋषीकेश ललवाणी, आशिष शिंदे, स्वराज नारायणे, ईशान होशिंग, अदित्य बोरा, पार्श्व भंडारी आदि ब्लॅक बेल्ट उपस्थित होते.

महावीर इंटरनॅशनलच्या अहिंसा चित्रकला स्पर्धेस प्रतिसाद

लहान गटात गुगळे, मोठ्या गटात पोखरणा प्रथम

समाचार/नगर-दि.२५

नगरच्या महावीर इंटरनॅशनलच्या वतीने नुकत्याच झालेल्या भगवान महावीर स्वामींच्या जयंतीचे औचित्य साधत अहिंसा या विषयावर भव्य चित्रकला स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषी महाराजांचे समाधीस्थळ आनंदधाम येथे झालेल्या या स्पर्धेस बाल चित्रकारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. प.पु.आदर्शऋषी महाराजांनी चित्रकला स्पर्धेस भेट देवून सर्व सहभागींना आशीर्वचन रुपी शुभेच्छा दिल्या. यावेळी महावीर इंटरनॅशनलचे नगर शाखेचे अध्यक्ष अरुण पारख, महिला अध्यक्षा वैशाली शेटिया, युवा अध्यक्ष स्वप्नील डुंगरवाल, मिरॅकलचे अध्यक्ष चेतन संचेती, निलेश बोथरा, शैलेंद्र कोठारी, नूतन संचेती, राणी पारख आदींसह महावीर इंटरनॅशनलचे सदस्य उपस्थित होते. स्पर्धेत सहभागी झालेले शेकडो स्पर्धक अहिंसेचे विचार कागदावर चितारण्यात रंगले होते.

यावेळी प. पु. आदर्शऋषी महाराज म्हणाले, महावीर इंटरनॅशनलच्या अहिंसा चित्रकला स्पर्धेमुळे नव्या पिढीच्या बालकांना जैन समाजाचे तीर्थनकर भगवान महावीर स्वामींच्या जीवनचरित्र्याचा परिचय होण्यास मदत होणार आहे. अहिंसा चित्रकला स्पर्धेचे स्तुत्य आयोजन करून उत्कृष्ट उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे मुलांची उन्हाळ्याची सुटी सार्थक लागणार आहे. भविष्यातही महावीर इंटरनॅशनलच्या वतीने महिला, पुरुष व बालकांचा उत्साह वाढण्यासाठी अशा विविध उपक्रमांचे आयोजन करावे. अहिंसा चित्रकला स्पर्धेत सहभगी सर्वांना व आयोजकांना सर्व जैन साधू साध्वींचे आशीर्वाद प्राप्त होतील, अशा शुभेच्छा दिल्या.

प्रास्ताविकात स्वप्नील डुंगरवाल यांनी महावीर इंटरनॅशनलच्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. अहिंसा चित्रकला स्पर्धे तील विजेत्यांची नावे प.पु. कुंदनऋषी महाराजांनी जाहीर केली. स्पर्धेचा निकाल लहान गट प्रथम धानिष्का गुगळे, द्वितीय दिशाली मुथा, तृतीय भक्ती बरमेचा. उत्तेजनार्थ माही खिवंसरा व खुशी गुगळे. मोठा गट प्रथम टीना पोखरणा, द्वितीय रोहित उमाटकर व तृतीय दिव्या कोठारी. विशेष पारितोषिक केसर छाजेड. असर्व विजेत्यांना आकर्षक पारितोषिके देण्यात आली.

ग्रंथराज दासबोध वाचन निरुपण मंडळाचा उपक्रम

नगरमध्ये शनिवारपासून भगवद्गीतेवर प्रवचनमाला

समाचार/नगर-दि.२५

येथील ग्रंथराज दासबोध वाचन निरूपण मंडळाच्या वतीने शनिवार दि.२७ ते सोमवार दि.२९ एप्रिल २०२४ दरम्यान रासनेनगरमधील श्रीदुर्गामाता मंदिराच्या सभागृहात सायंकाळी ६ ते ७ या वेळेत श्रीमद् भगवतगीतेवरील प्रवचनमालेचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि.२८ ते मंगळवार दि . ३० एप्रिल दरम्यान अभ्यासवर्गाचे नियोजन करण्यात आले आहे, अशी माहिती एस. एम.कुलकर्णी आणि अशोक भोंग यांनी दिली.

ते म्हणाले, श्रीमद् आद्य शंकराचार्य जयंतीनिमित्त प्रथमच प्रवचनमाला आणि अभ्यासवर्गाचे आयोजन करण्यात आले आहे. यवतमाळ येथील वेदांताचे गाढे अभ्यासक-आचार्य श्रीगुरू डॉ. सुनिल लुले यांची शनिवार दि.२७ ते सोमवार दि.२९ एप्रिलदरम्यान सायंकाळी ६ ते ७ या वेळेत सांख्ययोगातून शोकनिवृत्ती या विषयावर प्रवचनमाला होईल. रविवार दि.२८ ते मंगळवार दि. ३० एप्रिलदरम्यान सकाळी १० ते ११ या वेळेत समर्थभक्त शैलजा लुले या साईराज बंगला, ओंकार कॉलनी, रासनेनगर येथे अंतर्भाव या विषयावर अभ्यासवर्ग घेतील. नगरमध्ये प्रथमच होत असलेल्या या प्रवचनमालेचा आणि अभ्यासवर्गाचा जिज्ञासू अभ्यासकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन ग्रंथराज दासबोध वाचन निरूपण मंडळाचे सर्वश्री. सर्वोत्तम क्षीरसागर, राधेश्याम कुलकर्णी आणि शिरीष कुलकर्णी यांनी केले आहे.

विकणे आहे

गुलमोहर रोड येथील रोड टच पहिल्या मजल्यावरील १000 स्क्वे. फुटाची वेलफर्निश्ड ऑफिस स्पेस विकणे आहे.

-: संपर्क :-

9011923939

विकणे आहे

चालू स्थितीतील जिम साहित्य त्वरित विकणे आहे.

- संपर्क -

9834448462
9175075992

Shri. Kesharchand Gulabchand Munot, Newaskar Sarvajanik Trust's
(Religious Minority Trust)
ISO 9001 -2015 Certified College Green Audit
NAAC Accredited

K.G. College of Art's & Commerce

I.D. No. PU/AC/095/2007 (Night College)
(Affiliated to the Savitribai Phule Pune University)
(Permanent Non Grant Basis)
Pandit Nehru Hindi Vidyalay Campus, Fort Road, Near L.I.C. Office,
Ahmednagar. – 414 002. Tel. (0241) 2326960
E- mail : kg.college@yahoo.com / Website – kgcollege.in

WANTED

Invites Application for the following posts for Academic year 2024-25

No.	Post	Subject	Qualification	No. of Post
1.	Lecturer	English	M.A. , SET /NET	01 (Full Time)
2.	Lecturer	Commerce	M.Com	01 (Full Time)
3.	Clark	Office Clark	B.Com., M.Com.	01 (Full Time)

Apply within 08 days from the publication of this advertisement.

Ahmednagar.
Dt. 25/04/2024

Mr. Kishor Hastimal Munot
Trustee Director

SASE DCORATERS

Mandap, Light & Flower Decoraters

Add. Katvan Khandoba Road, Ahmednagar

9822331006, 9579544110

शेंदूर, गुलाल, कुंकू, भंडारा, भाजकी (काळी) माती, क्रिस्ट्रल रांगोळी, कलर रांगोळी, मीठ, नुडल्स, बांधकाची रांगोळी

M डागा शांतीलाल डागा

दाळमंडई/मार्केट यार्ड, अहमदनगर.
फोन नं. ७५८८११५१५७, ९८२२०८१४४०

टीप : मुव्ही शो च्या वेळा बदलू शकतात

दिनांक - १९ एप्रिल ते २५ एप्रिल २०२४

बडे मियाँ छोटे मियाँ	8.00 AM 11.10 AM 02.15 PM 07.00 PM 11.00 PM
मैदान	8.30 AM,12.00 PM 6.45 PM,10.15 PM
स्वातंत्र्यवीर सावरकर	03.25 PM
GODZILLA X KONG	5.30 PM
CREW	01.25 PM 10.30 PM
राजकारण गेलं मिशीत	04.00 PM
द लिगसी ऑफ जिनेश्वर	10.00 AM 07.40 PM

for screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher *
- Offer Vaild On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurlous Cinematic Paradlse

AVAILABLE ON book my show **CONNPLEX** AVAILABLE ON book my show

3" Floor, Kohinoor Mall, Premdan chowk, Savedi, A. Nagar.
Mo. 6353564618 / 7790094001 / 7790094002

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकती विद्यमान मालकांच्या मालकी वहिवाटीच्या व प्रत्यक्ष कब्जातील आहे. विद्यमान मालकांनी सदर मिळकती आमच्या अशिलास कायमखूश खरेदी देण्याचे कबूल केलेले आहे. सदर मिळकती निर्वेध, निजोखमी व बोजारहीत आहेत, याची हमी विद्यमान मालकांनी आमचे अशिलास दिलेली आहे व लवकरच अटी व शर्तीची पूर्तता झाल्यावर विद्यमान मालक आमचे अशिलाचे लाभात सदर मिळकतीचे खरेदीखत लिहून देणार आहेत. तरी सदर मिळकतीबाबत विद्यमान मालकांव्यतिरिक्त अन्य कोणाचाही कोणताही हक्क, हितसंबंध, वारसा हक्क, दावा, मनाईहुकूम, अव्वल जप्ती, साठेखत, विसार पावती, अथवा अन्य कोणताही हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसांच्या आत कागदपत्रांनिशी खालील पत्त्यावर कळवावे व त्यांचे असलेल्या हक्क, हितसंबंधाबाबत खात्री करून द्यावी, अन्यथा मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजारहित आहे, असे पाहून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व मागाहून कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती आमचे अशिलांवर व मिळकतीवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

परिशिष्ट - मौजे नालेगाव, ता. जि. अहमदनगर येथील अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील येथील स. नं. ८३/२ब/१+८३/२ब/२+१०५/१ (संगणकीय उताऱ्याप्रमाणे स. नं. ८३/२ब/१/८३/२ब/२/१०५/१) मधील प्लॉट नं. ८३ व ८४ यांसी प्रत्येकी क्षेत्र ३१८.७५ चौ. मी. (३.१८.७५ आर. चौ. मी.) यांसी एकत्रित चतुःसीमा - पूर्वेस - प्लॉट नं. ८२, दक्षिणेस - ॲमिनिटी व प्लॉट नं. ८६, पश्चिमेस - प्लॉट नं. ८५ व उत्तरेस - १२ मीटर रुंदीचा रस्ता येणेप्रमाणे चतुःसीमापूर्वक बिनशेती प्लॉट मिळकती तदंगभूत वस्तूसुद्धा, वागणुकीच्या व वहिवाटीच्या हक्कासह, काहीएक राखून न ठेविता. सदर प्लॉट नं. ८३ चे विद्यमान मालक पारस हिंमत पटेल व प्लॉट नं. ८४ चे विद्यमान मालक कपिल हिंमत दिवाणी, दोघे रा. प्लॉट नं. १९१/६, भारत टिंबर, संकेत हॉटेलसमोर, टिळक रोड, अहमदनगर.

अहमदनगर
ता. २५/०४/२०२४

ॲड. नगरकर यू. आर.
३६२, चौपाटी कारंजा अहमदनगर

UNITED PHARMA
Sargical & Generic Medicine

UNITED PHARMA
Pharmaceutical Distributors
Near Kedgaon Ves, Kedgaon
90 49 93 44 44
79 72 37 80 81
98 22 02 06 49

Milk & Cream Icecream Product

Arun® ICECREAMS

प्रोप्रा : किशोर मुदगल डी-१२, एमआयडीसी अहमदनगर 7219515144